# THE PICTURE OF DORIAN GRAY

# द पिक्चर ऑफ डोरिअन ग्रे




वृषाली जोशी

OSCAR WILDE

# द पिक्चर ऑफ़
# डोरिअन ग्रे

मूळ इंग्लीश लेखक – ऑस्कर वाईल्ड

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

# द पिक्चर ऑफ़ डोरिअन ग्रे

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# द पिक्चर ऑफ़ डोरिअन ग्रे

## लेखक : ऑस्कर वाईल्ड

अनुवादक : वृषाली जोशी
चलभाष : ९९२१७४६२४५
इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ४ जानेवारी २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पणपत्रिका

प्रिय शरद

मला लिखाणासाठी नेहमीच

प्रोत्साहन दिल्याबद्दल

# प्रस्तावना

मी काही वर्षांपूर्वी The Picture of Dorian Gray ही ऑस्कर वाईल्ड यांची कादंबरी वाचली व तिचे मराठीत भाषांतर केले. नंतर ती तशीच पडून राहिली. आता ई साहित्यतर्फे ती प्रकाशित होत आहे.

# वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून व दोन पुस्तके ई साहित्यतर्फे प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन

संशोधन प्रकल्पात सहभाग

कॉलेजमध्ये प्राचार्यपद


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके

सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद

संपर्क वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९

चलभाष ९९२१७४६२४५ mail id vrishalisjoshi@gmail.com


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_1a_vrishali_joshi.pdf





http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mejavaanipurvi_and_other_stories_somerset_maughm_vrishali_joshi.pdf



# ऑस्कर वाइल्डबद्दल




१८५४ साली, डब्लीन, आयर्लंड; येथे जन्मलेल्या ऑस्कर वाइल्डचे, फ्रेंच व जर्मन भाषांवर प्रभुत्व होते. त्याचे वडील सर्जन व आई लेखिका होती. 'डोरीअन ग्रेचे चित्र' ही त्याची एक अदभुतरम्य कादंबरी आहे. तारुण्याच्या मोहात फसलेला राजा ययाति किंवा अनवधानाने का होईना, पण आपल्या पुत्राचे, राजपुत्र देवव्रताचे, तारुण्य नासवणारा राजा शंतनु या व्यक्तीचित्रांचे, मला या गोष्टीशी, काही अंशी साम्य वाटते. याचे नाट्यप्रयोगही केले गेले. उत्कृष्ट नाट्य सादरीकरणाबद्दलचे रेट्रो ह्युगो पारितोषिक, ऑस्कर वाइल्डला मिळाले होते. ती कादंबरी लघुरुपात खाली मांडली आहे.


M-G-M presents
Oscar Wilde's
The
PICTURE OF
DORIAN
GRAY
YOUTH'S ADVENTURE IN
With
GEORGE SANDERS
HURD HATFIELD · DONNA REED
ANGELA LANSBURY · PETER LAWFORD LOWELL GILMORE · RICHARD FRASER
Directed by Albert Lewin · Produced by Pandro S. Berman A Metro-Goldwyn-Mayer Picture

# डोरिंअन ग्रेचे चित्र

## प्रकरण १

## असामान्य सुंदर तरूण मनुष्य



गुलाबाचा सुवास खोलीत भरुन राहिला होता. लॉर्ड हेन्री वॉटन, सोफ्यावर बसून सिगरेट ओढत होता. दूरवरील, लंडनच्या रस्त्यावरील गजबज, उघड्या दारातून जाणवत होती.

खोलीच्या मध्यभागी एका विलक्षण सुंदर तरुण माणसाचे चित्र झळकत होते. बेसिल हॉलवर्ड हा स्वतः चित्रकार, त्या चित्रापुढे थोड्याच अंतरावर बसला होता. चित्रकाराने चित्राकडे बघितले व तो हसला.

“बेसिल, हे तुझे सर्वोत्कृष्ट काम आहे. तू आतापर्यंत केलेल्या कामातील सर्वात उत्तम! तू ते खरोखरच पुढच्या वर्षी ग्रॉसव्हेनॉरला पाठवायला पाहिजेस. ग्रॉसव्हेनॉर हीच खरे पहाता, या चित्राच्या प्रदर्शनासाठी एकुलती एक योग्य जागा आहे.” लॉर्ड हेन्री सावकाश म्हणाला.

ऑक्सफर्ड विद्यापीठातील त्याच्या मित्राना हसू आणणाऱ्या विचित्र पद्धतीने डोके हलवत, चित्रकाराने उत्तर दिले, “मला नाही वाटत, की मी ते कुठे पाठवीन. नाही. मी ते कुठेच पाठवणार नाही.”

लॉर्ड हेन्रीने त्याच्या सिगरेटच्या पातळसर निळ्या धुरामधून आश्चर्याने बेसिलकडे पाहिले. “कुठेच पाठवणार नाहीस? अरे माझ्या मित्रा, पण का नाही? तुम्ही चित्रकार म्हणजे, तऱ्हेवाईकच असता.”

“मला माहिती आहे की तू मला हसशील. पण मी खरंच ते प्रदर्शित करू शकत नाही. मी त्याच्यात माझे सर्वस्व ओतले आहे.” बेसिल उत्तरला.

सोफ्यावर आळोखेपिळोखे देत लॉर्ड हेन्री हसला. “तुझे सर्वस्व त्यात ओतले आहेस? बेसिल, खरंच हा मनुष्य फार सुंदर आहे. तो तुझ्यासारखा दिसत नाही.”

कलाकार बोलला, “हेन्री, तू मला समजून घेत नाही आहेस. अर्थात, मी त्याच्यासारखा नाहीच आहे. त्याच्यासारखे असायला, मला आवडणारही नाही. इतर माणसांपेक्षा फार वेगळे असणे, चांगले नव्हे. बुद्दू व कुरूप लोकांचे, या जगात उत्तम होते. डोरिअन ग्रे — “

“डोरिअन ग्रे? हे त्याचे नाव आहे का?” बेसिलकडे चालत येत, लॉर्ड हेन्रीने विचारले.

“हो. हेच त्याचे नाव आहे. मी तुला सांगणार नव्हतो.”

“का सांगणार नव्हतास?”

“खरे तर का, हे मी तुला समजाऊन सांगू शकत नाही. जेव्हा मला कोणी लोक अतिशय आवडतात, तेव्हा मी त्यांची नावे कुणाला सांगत नाही. हा शुध्द वेडेपणा आहे, असे तुला वाटते आहे, होय ना?”

“मुळीच नाही.” लॉर्ड हेन्री म्हणाला. “अजिबात नाही. माझ्या प्रिय बेसिल, तू हे विसर, की मी विवाहित असल्याने माझ्या आयुष्यात खूप गुपिते आहेत. माझी पत्नी कुठे असते, हे मला माहिती नसते व मी काय करतो, याचा बायकोला थांगपत्ता नसतो. जेव्हा आम्ही एकमेकाना भेटतो, तेव्हा अत्यंत गंभीर चेहऱ्याने आम्ही एकमेकांशी खोटे बोलतो.”

“हेन्री, तू तुझ्या वैवाहिक आयुष्याबद्दल ज्या तऱ्हेने बोलतोस, त्याचा मला तिरस्कार वाटतो.” बागेकडे जाणाऱ्या दाराकडे चालत जात, बेसिल हॉलवर्ड म्हणाला. “माझा विश्वास आहे, की तू खरोखर एक चांगला पती आहेस. पण त्याची तुला लाज वाटते. तू कधी चांगले बोलत नसशील, पण कधीही चुकीची गोष्ट करत नाहीस.”

लॉर्ड हेन्री हसला व ते दोघे एकत्रितपणे बागेत गेले. काही वेळाने लॉर्ड हेन्रीने आपले घड्याळ बाहेर काढले व संथ आवाजात बोलला, "बेसिल, मला वाटते मला आता गेले पाहिजे. पण तू डोरिअन ग्रेचे चित्र का प्रदर्शित करू इच्छित नाहीस याचे स्पष्टीकरण, मी जाण्यापूर्वी तुझ्याकडून मला हवे आहे. मला खरेखुरे कारण जाणून घ्यायचे आहे."

"मी तुला खरे कारण सांगितले आहे."

"नाही. तू सांगितले नाहीस. तू असे म्हणालास, की त्यात तू तुझे सर्वस्व ओतले आहेस. हे पोरकट आहे."

बेसिल सरळ त्याच्या चेहऱ्याकडे पाहत बोलला, "हेन्री, भावना ओतून काढलेले प्रत्येक चित्र त्या मॉडेलचे नसून, स्वतः चित्रकाराचे असते. मी हे चित्र प्रदर्शित करणार नाही, कारण त्यात माझ्या स्वतःच्या आत्म्याचे गूढ मी चितारले आहे."

लॉर्ड हेन्री हसून म्हणाला, "आता हे आणखी काय?"

"अरे हेन्री, त्यात सांगण्यासारखे खरेच अगदी थोडे आहे. आणि मला नाही वाटत की ते तुला समजेल. कदाचित तू विश्वास ठेवणार नाहीस."

लॉर्ड हेन्रीने हसून, गवतातून एक फूल तोडून घेतले व त्याकडे बघत तो उद्गारला, "मी नक्कीच ते समजून घेऊ शकेन, असा मला विश्वास वाटतो. मी कशावरही, विश्वास ठेऊ शकतो."

"गोष्ट अगदी साधी आहे" चित्रकार म्हणाला. "दोन महिन्यांपूर्वी, लेडी ब्रँडनकडे मी मेजवानीसाठी गेलो होतो. मी तिथे जाऊन दहा मिनिटे झाल्यावर, अचानक माझ्या लक्षात आले की कोणीतरी माझ्याकडे बघते आहे. मी वळलो आणि प्रथमच डोरिअन ग्रेला पाहिले. जेव्हा आमची नजरभेट झाली, तेव्हा मी गोठूनच गेलो. हा मुलगा माझे संपूर्ण अंतर्मन व्यापून रहाणार आहे, असे मला जाणवले."

"मग तू काय केलेस?"

आम्ही अगदी जवळ होतो. एकमेकाना चिकटून असल्यासारखेच! परत आमची नजरभेट झाली. मी लेडी ब्रँडनला आमची ओळख करून द्यायला सांगितली."

"डोरिअन ग्रेबद्दल, लेडी ब्रँडन काय म्हणाली?"

"गोंडस मुलगा आहे" असेच काहीतरी. "मला माहिती नाही, तो काय करतो. मला वाटते, तो काहीच करत नाही. अरे हो! तो पियानो वाजवतो किंवा व्हॉयोलीन." डोरिअन व मी दोघेही हसलो. आम्ही त्याच क्षणी एकमेकांचे मित्र झालो.

"हसणे, ही काही मैत्रीची वाईट सुरवात नाही. आणि तो एक चांगला शेवटही आहे." दुसरे फूल तोडत लॉर्ड हेन्री म्हणाला.

बेसिल हॉलवर्ड त्याची मान हलवत बोलला, "मैत्री म्हणजे काय, हे तुला कळतच नाही. हेन्री, तुला प्रत्येकजण सारखाच वाटतो."

"हे खरे नाही." त्याची टोपी मागे टाकून, आकाशाकडे बघत लॉर्ड हेन्री कुरकुरला, "मी माझे मित्र त्यांच्या सुंदरतेसाठी निवडतो व शत्रू त्यांची बुद्धीमत्तेसाठी. शत्रूंची निवड माणूस फार काळजीपूर्वक करू शकत नाही. अर्थात माझ्या संबंधियांचा, मी द्वेषच करतो आणि गरीब लोक कुरूप, मूर्ख व पिणारे असतात म्हणून तेही मला आवडत नाहीत."

"तू बोलत आहेस, त्यातला एकही शब्द मला पटत नाही. आणि माझी खात्री आहे की तुलाही ते पटत नाही."

बोटांनी त्याची तपकिरी, टोकदार दाढी कुरवाळत व काठीने त्याच्या बुटांच्या टोकाला स्पर्श करत, लॉर्ड हेन्री उद्गारला, "बेसिल, तू खरा इंग्रज आहेस ना? एखादी कल्पना योग्य की अयोग्य, याचा विचार न करता, आपण त्या कल्पनेशी फक्त सहमत आहोत की नाही, यातच खऱ्या इंग्रजाला स्वारस्य असते. पण डोरिअन ग्रेबद्दल मला अजून सांग. तू त्याला वारंवार भेटतोस का?"

"रोज जर त्याला भेटलो नाही, तर मला चैन पडत नाही."

"किती विचित्र आहे! मला वाटले, की तुला फक्त तुझ्या कलेचीच कदर आहे."

"आता माझ्या कलेचे सर्वस्व तोच आहे." तो चित्रकार म्हणाला. "मला याची जाणीव आहे. डोरिअन ग्रे भेटल्यापासून मी जे काम केले, ते माझ्या आयुष्यातील सर्वात उत्तम काम आहे. काय व कसे माहिती नाही पण त्याच्या व्यक्तिमत्वाने, माझ्या कलेला एक वेगळे वळण दिले आहे. तो खरे तर वीस वर्षांहून अधिक मोठा असेल, पण पण तो लहानसा मुलगा वाटतो. तो जेव्हा माझ्याबरोबर असतो तेव्हा मला जग वेगळेच भासते."

"बेसिल, हे काहीतरी असामान्य वाटते. मला डोरिअन ग्रेला, बघितलेच पाहिजे."

बेसिल त्याच्या जागेवरून उठला व बागेत वरखाली फेऱ्या मारू लागला. जरा वेळाने तो बोलला, "हेन्री, डोरिअन ग्रे हा माझ्या कलेचे सर्वस्व आहे. तुला कदाचित, त्याच्यात काही दिसणार नाही. पण मला त्याच्यात सारे काही दिसते."

"पण मग तू त्याचे चित्र, प्रदर्शित का करत नाहीस?" इति लॉर्ड हेन्री.

"कलाकाराने सुंदर गोष्टीचे चित्र काढावे, पण त्यात स्वतःचे आयुष्य, अजिबात डोकाऊ देऊ नये. ते सौदर्य काय आहे, हे मी एक दिवस जगाला, प्रत्यक्ष डोरिअन दाखवून देईन. पण त्या कारणासाठी जग माझे डोरिअन ग्रेचे चित्र, कधीच बघणार नाही."

"मला वाटते बेसिल, तू चुकतो आहेस. पण मी तुझ्याबरोबर वाद घालणार नाही. मला सांग, डोरिअन ग्रे तुझा निस्सीम चाहता आहे का?"

चित्रकाराने थोडा वेळ विचार केला. "त्याला मी आवडतो." मग जरा थांबून तो उत्तरला, "मला माहिती आहे, की मी त्याला आवडतो. अर्थात मी त्याची फार स्तुती करतो व त्याला सांगू नयेत अशा गोष्टीही सांगतो. आम्ही हजारो आश्चर्यकारक तास एकत्र घालवतो. पण कधी कधी तो भयंकर अविचाराने वागतो. मला दुःख देण्यात, त्याला मजा वाटते. हेन्री, त्यावेळेस मला असे वाटते की मी त्याच्यावरून ओवाळून टाकलेल्या माझ्या जिवाचा उपयोग, तो उन्हाळ्याच्या दिवसात कोटाला लावलेल्या फुलासारखा करत आहे."

"उन्हाळ्यातील दिवस मोठा असतो, बेसिल. कदाचित तो कंटाळण्याच्या आत तूच कंटाळशील. सौदर्यापेक्षा बुद्धीमत्ता जास्त टिकते. एक दिवस तू तुझ्या मित्राकडे बघशील आणि त्याचा रंग किंवा तत्सम काहीतरी तुला आवडणार नाही. नंतर तुला वाटू लागेल, की तो तुझ्याशी वाईट वागला आहे — "

"हेन्री, असे काहीतरी बोलू नको. मी जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत डोरिअन ग्रे माझे सर्वस्व असेल. मला काय वाटते, माझ्या भावना काय आहेत, ते तू समजू शकत नाहीस."

"माझ्या प्रिय बेसिल, मी समजू शकतो." लॉर्ड हेन्रीने त्याच्या छानशा चांदीच्या डबीतून सिगरेट काढून, ती पेटवली. मग हॉलवर्डकडे वळून तो म्हणाला, "मला आताच आठवले."

"काय आठवले, हेन्री?"

"मी डोरिअन ग्रेचे नाव कुठे ऐकले ते."

"कुठे ऐकले?" हॉलवर्डने रागाने विचारले.

"इतका चिडू नकोस, बेसिल. माझी मावशी लेडी अगाथाकडे! हा विस्मयकारक तरुण माणूस मला सापडला आहे असे ती म्हणाली. लंडनच्या पूर्व टोकाला गरीब मुलांसाठी ती काम करते. त्यात तो तिला मदत करणार होता आणि त्याचे नाव डोरिअन ग्रे होते. अर्थात तो तुझा मित्र आहे हे मला माहिती नव्हते."

"तुला माहिती नव्हते, हे फार बरे झाले, हेन्री."

'का?"

"तू त्याला भेटावेस, असे मला वाटत नाही."

नोकर बागेत येऊन म्हणाला, "घरात मिस्टर डोरिअन ग्रे, तुमची वाट पहात आहेत."

"आता तू माझी ओळख करून द्यायलाच हवीस." हसत, लॉर्ड हेन्री ओरडला.

चित्रकार त्याच्या नोकराकडे वळला. "मिस्टर ग्रेना थांबायला सांग, पार्कर. मी थोड्या वेळात येतोच."

मग त्याने लॉर्ड हेन्रीकडे पाहिले व बोलला, "डोरिअन ग्रे, हा माझा जिवलग मित्र आहे. तो सुंदर व्यक्ती आहे. त्याला बिघडवू नकोस. त्याच्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करू नकोस. तुझा प्रभाव वाईट ठरेल. मला खराखुरा कलावंत बनवणाऱ्या एका व्यक्तीपासून, मला तोडू नकोस."

"काहीतरी मूर्खासारखे काय बोलतोस?" लॉर्ड हेन्री हसत म्हणाला. त्याने हॉलवर्डच्या गळ्यात हात टाकून, त्याला जवळजवळ ओढत घरात आणले.



# प्रकरण २

## स्वतःच्याच चित्राबद्दल मत्सरी



ते आत शिरले व त्यांनी डोरिअन ग्रेला पाहिले. त्यांच्याकडे पाठ करून तो पियानोसमोर बसला होता आणि स्कूमनच्या संगीतावरील पुस्तकाची पाने उलटत होता. “तू हे मला द्यायलाच पाहिजेस, बेसिल” तो ओरडला. “मला ते शिकायचे आहे.”

“तू माझ्यासाठी आज चांगला बसलास, तर कदाचित, डोरिअन.”

“बापरे! मी बसून कंटाळलो आहे आणि मला माझे चित्र नको आहे.” झर्रकन वळत मुलगा म्हणाला. त्याने लॉर्ड हेन्रीला पाहिले. त्याचा चेहरा क्षणभर लाल झाला. “माफ कर बेसिल, तुझ्याबरोबर कोणी आहे, हे मला माहिती नव्हते.”

“हा लॉर्ड हेन्री वॉटन आहे, डोरिअन. तो माझा जुना मित्र आहे. आम्ही ऑक्सफर्डला एकत्र होतो. मी आताच त्याला सांगत होतो, की चित्राकरता तू उत्तम बसतोस आणि तू आता सर्व बिघडवून टाकलेस.”

"तुला भेटून माझ्या आनंदावर काहीही विरजण पडलेले नाही, मिस्टर ग्रे. माझी मावशी लेडी अगाथा, तुझ्याबद्दल माझ्याजवळ नेहमी बोलते." हस्तांदोलनासाठी हात पुढे करत लॉर्ड हेन्री बोलला.

"मला भीती आहे की लेडी अगाथा, आता माझ्यावर रागावलेली असेल. गेल्या मंगळवारी, व्हाईटचॅपेल येथील क्लबमध्ये तिच्याबरोबर जायचे मी कबूल केले होते. पण मी ते साफ विसरलो. ती आता मला काय म्हणेल कोणास ठाऊक?"

लॉर्ड हेन्रीने त्याच्याकडे पाहिले. त्याचे कमानदार लालचुटुक ओठ, निळे प्रामाणिक डोळे व सोनेरी केस यामुळे तो खरंच आश्चर्यकारक रित्या देखणा दिसत होता. "अरे माझ्या मावशीची काही काळजी करू नकोस. तिच्या आवडत्या लोकांपैकी तू आहेस. पण गरीब लोकांबरोबर काम करून वेळ फुकट घालवणे, हे तुझ्यासारख्याला शोभेसे नाही."

लॉर्ड हेन्री सोफ्यावर बसला व त्याने सिगरेट केस उघडली. चित्रकार रंग मिसळण्यात गर्क होता. त्याचे ब्रश तयार करत होता. अचानक लॉर्ड हेन्रीकडे वळून तो म्हणाला, "हेन्री, मला हे चित्र पुरे करायचे आहे. तुला मी आता जायला सांगितले, तर तुला तो माझा फार उद्धटपणा वाटेल का?"

लॉर्ड हेन्री हसला व त्याने डोरिअन ग्रेकडे पाहिले. "मिस्टर ग्रे, मी जाऊ का?" त्याने विचारले.

"कृपया नको, लॉर्ड हेन्री. मला असे दिसते आहे, की बेसिल मनाच्या कठीण अवस्थेत आहे व त्याचा हा मूड मला अजिबात भावत नाही. आणि तुम्ही मला हे सांगितले पाहिजे, की मी गरीब लोकाना मदत का करू नये?"

"मिस्टर ग्रे, ते फार कंटाळवाणे होईल. पण तू म्हणत असशील तर मी जात नाही. बेसिल, चालेल का? तू नेहमी म्हणतोस की तुझ्या मॉडेलशी बोलायला कुणी असले तर तर ते तुला आवडते."

हॉलवर्ड त्याचे ओठ चावून म्हणाला, "जर डोरिअनला तसे हवे असेल तर! डोरिअनला जसे हवे असते, तसेच नेहमी होते."

लॉर्ड हेन्रीने त्याची टोपी व मोजे उचलले. "नाही. मला वाटतं, मला गेलेच पाहिजे. मिस्टर ग्रे, कर्झन रस्त्यावरील माझ्या घरी, एखाद्या दुपारी येऊन मला भेट. बहुतेक वेळा मी पाच वाजता घरीच असतो."

डोरिअन ग्रे ओरडला, "बेसिल, जर लॉर्ड हेन्री वॉटन जात असतील तर, मी सुद्धा जातो. तू चित्र काढताना, चकार शब्दही बोलत नाहीस आणि इथे नुसते उभे रहाणे, मला अतिशय कंटाळवाणे होते. त्याना थांबायला सांग."

"ठीक आहे हेन्री, कृपया थांब. डोरिअनसाठी व माझ्यासाठी." चित्राकडे टक लाऊन बघत, हॉलवर्ड बोलला.

"हे खरे आहे की मी चित्र काढताना, कधीच बोलत नाही व ऐकतही नाही. हे माझ्या मॉडेलला फार त्रासदायक होत असणार. परत स्थानापन्न हो हेन्री, आणि डोरिअन, फार हलू नकोस किंवा लॉर्ड हेन्रीचे फार ऐकू नकोस. त्याच्या सर्व मित्रांवर तो फार वाईट रित्या, प्रभाव टाकतो."

हॉलवर्ड त्याचे चित्र पुरे करेपर्यंत, डोरिअन ग्रे उभा राहिला. त्याने लॉर्ड हेन्रीला जेवढे पाहिले, त्यात तो त्याला आवडला. त्याचा आवाज मंजुळ होता. पण बेसिलला, तो खूप वेगळा वाटत होता. जरा वेळाने डोरिअन, लॉर्ड हेन्रीला म्हणाला, "तू खरंच वाईट रित्या प्रभाव टाकतोस का? बेसिल म्हणतो तितका वाईट?"

"प्रभाव नेहमी वाईटच असतो."

का?"

"कारण प्रभाव टाकणे म्हणजे तुमचा आत्मा त्याना देणे. प्रत्येक माणसाला त्याचे स्वतःचे व्यक्तिमत्व हवे."

"डोरिअन, तुझे डोके जरा उजव्या बाजूला कललेले ठेव." चित्रकार बोलला. तो संभाषण ऐकत नव्हता आणि मुलाच्या चेहऱ्यावरील नवी चमक, फक्त त्याला कळत होती.

लॉर्ड हेन्री त्याच्या खर्जातील मंजुळ आवाजात म्हणाला, "आणि तरीही एखादा मनुष्य त्याचे आयुष्य पूर्णत्वाने व भरभरून जगला, तर तो जग बदलू शकतो यावर माझा विश्वास आहे. आपल्या कल्पनेच्या पलिकडील उंचीचे कलात्मक आयुष्य, तो जगू शकतो. पण आपल्यातील सर्वात शूर माणूस, स्वतःलाच घाबरतो. मिस्टर ग्रे, तू तरुण आहेस, पण तुझ्या वासना, तुला घाबरट बनवत आहेत. तुझी स्वप्नं —

"डोरिअन ग्रे ओरडला, "थांबा. तुम्ही काय म्हणता, ते मला कळत नाही. मला विचार करून बघितले पाहिजे."

ओठ उघडे टाकून व डोळ्यात विचित्र चमक घेऊन, तो जवळजवळ दहा मिनिटे तिथे उभा राहिला. बेसिलच्या मित्राने जे उद्गार काढले, ते त्याच्या हृदयाला भिडले. हो. अशा

काही गोष्टी होत्या, की ज्या त्याच्या किशोर वयात त्याला उमगल्या नव्हत्या. त्या त्याच्या आत्ता लक्षात आल्या.

लॉर्ड हेन्री हसून, त्याचे निरीक्षण करत होता. नेमक्या कोणत्या क्षणी गप्प रहायचे, ते त्याला माहिती होते. त्याच्या शब्दांचा मुलावर अचानक परिणाम झालेला बघून, तो स्तंभित झाला. काय विलक्षण मुलगा होता तो!

हॉलवर्ड चित्र काढण्यात दंग होता. दुसरे शांत झाले आहेत, स्तब्धता पसरली आहे, हे त्याच्या लक्षात आले नाही.

"बेसिल, मी दमलो. मला जाऊन बागेत बसले पाहिजे. इथे अजिबात हवा नाही.' डोरिअन ग्रे कुरकुरला.

"माझ्या प्रिय मुला, माझा नाईलाज आहे. मी जेव्हा चित्र काढत असतो, तेव्हा फक्त माझ्या कामाचाच, मी विचार करू शकतो. पण तू इतकी छान बैठक, कधीच दिली नव्हतीस. हेन्री तुझ्याशी काय बोलत होता, कुणास ठाऊक! पण तुझ्या डोळ्यात आश्चर्यकारक चमक आली आहे. मला वाटते, तो बहुधा तुझी स्तुती करत असावा. त्याच्या एकाही शब्दावर, विश्वास ठेऊ नकोस."

"नाही, तो माझी भलावण करत नव्हता. पण बहुधा त्याने सांगितलेल्या कुठल्याच गोष्टीवर माझा विश्वास बसला नाही."

"तुला माहिती आहे, की तू सगळ्यावर विश्वास ठेवला आहेस." लॉर्ड हेन्री त्याच्या स्वप्नाळू डोळ्यांनी बघत बोलला. "मी तुझ्याबरोबर बागेत येतो. या खोलीत भयंकर उकडते आहे."

लॉर्ड हेन्री बागेत गेला व चेहऱ्याशी फूल धरून उभ्या असलेल्या डोरिअन ग्रेला पाहिले. तो त्याच्या जवळ गेला. त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

डोरिअन ग्रेने कपाळाला आठ्या घातल्या व तो बाजूला झाला. पण त्याच्या जवळ उभा असलेला उंच मनुष्य त्याला आवडला. त्याच्या सावळ्या, अदभुतरम्य चेहऱ्याबद्दल, त्याला कुतूहल वाटले. त्याच्या खर्जातल्या मंजुळ आवाजामध्ये, काही जादू होती. पण त्याला थोडी भीती वाटली. या परक्या माणसाचा आपल्यावर, असा जबरदस्त प्रभाव का पडतो आहे? बेसिल हॉलवर्डला तो कित्येक महिने ओळखत होता, पण त्यांच्यातल्या मैत्रीमुळे त्याच्यात काही बदल झाला नाही. पण आयुष्याच्या गुप्ततेची कळ ज्याला सापडली आहे अशा कोणीतरी येऊन, त्याचे आयुष्य ढवळून काढल्यासारखे, त्याला आता वाटत होते. तरीही त्यात घाबरण्यासारखे काय होते? तो काही शाळकरी मुलगा नव्हता. घाबरणे वेडेपणाचे होते.

"चल. आपण सावलीत बसू. सूर्याच्या उन्हात तू भाजून निघावेस अशी माझी इच्छा नाही."

"त्यामुळे काय होणार आहे?" डोरिअन ग्रे कुरकुरला व हसतहसत बागेच्या टोकाशी असलेल्या आसनावर बसला.

"त्यामुळे खूप काही होते आहे, मिस्टर ग्रे."

"कसे काय?"

"तू तरुण आहेस व तरुणपण जपणे, ही जगातील सर्वात चांगली गोष्ट आहे."

"लॉर्ड हेन्री, मला नाही असे वाटत!"

"नाही. आत्ता तुला तसे वाटणार नाही .केव्हातरी तू म्हातारा व कुरूप होशील तेव्हा तुला अचानकपणे ते जाणवेल. आत्ता तू जिथे जिथे जातोस, तिथे तिथे आनंद फुलवतोस. सदैव असे राहील का? — तुला अगदी पराकोटीचा सुंदर चेहरा लाभला आहे, मिस्टर ग्रे."

"मला नाही वाटत — "

"रागाऊ नकोस. हे खरे आहे. देवाची तुझ्यावर कृपा आहे. पण देवाची जशी कृपा होते, तशी लवकरच अवकृपाही होते. पूर्णत्वाने व समग्रपणे जगण्याचा काळ खरे पहाता, प्रत्येकाला थोडाच मिळतो. तू आता तरुण आहेस, तोपर्यंत मस्त आयुष्य जगून घे."

अचानक चित्रकार दारात अवतीर्ण झाला आणि त्याना आत येण्यासाठी खुणावू लागला. ते एकमेकांकडे पाहून हसले. "मी वाट पहातो आहे. कृपया आत या. आता अगदी योग्य असा उजेड आहे." तो ओरडला.

ते उठले व जोडीने घराकडे चालू लागले.

"मिस्टर ग्रे, मला भेटून तुला आनंद झाला का?" त्याच्याकडे बघत लॉर्ड हेन्री बोलला.

"हो. मी आता आनंदी आहे. मला आशा वाटते, की मी सदैव आनंदी राहीन."

"सदैव? हा भयंकर शब्द आहे. बायकाना हा शब्द वापरायला फार आवडतो."

वीस मिनिटांनंतर हॉलवर्डलने चित्र काढणे थांबवले. त्याने थोडे मागे होऊन, चित्राकडे काही क्षण बघितले. नंतर तो थोडा वाकला व खालच्या कोपऱ्यात लाल रंगाने सही केली. त्याचे नाव लिहिले.

तो उद्गारला, “हे काढून पूर्ण झाले.”

लॉर्ड हेन्रीने येऊन चित्राचे परीक्षण केले. ते चित्र म्हणजे खरंच, कलाजगतातील आश्चर्यकारक काम होते. तो म्हणाला, “प्रिय मित्रा, आपल्या काळातील हे सर्वोत्कृष्ट पोर्टेट आहे. मिस्टर ग्रे, इकडे ये व तुझ्या स्वतःकडे पहा.”

चित्राकडे पहाण्यासाठी डोरिअन ग्रे तिरपा चालत आला. त्याने ते पहाताच त्याचे गाल, आनंदाने आरक्त झाले. स्वतःच्या सौदर्याची ओळख प्रथमच पटल्यासारखे त्याला वाटले. पण नंतर त्याला लॉर्ड हेन्रीचे उद्गार आठवले. त्याचे सौदर्य फक्त काही वर्षेच, टिकणार होते. एक दिवस तो म्हातारा व कुरूप होणार होता.

“तुला ते आवडले नाही का?” मुलगा काहीच बोलत नाही असे बघून, हॉलवर्डलने विचारले.

“अर्थातच त्याला ते आवडले. आधुनिक चित्रकलेतील ते अत्युत्तम चित्र आहे. तू याची म्हणशील ती किंमत मी देईन पण माझ्याकडे ते हवेच.” लॉर्ड हेन्री उद्गारला.

“हेन्री, ते विकायला माझे नाही आहे.”

“मग कोणाचे आहे?”

चित्रकाराने उत्तर दिले, “अर्थातच डोरिअनचे.”

“तो खरंच भाग्यवान आहे.”

डोरिअन ग्रे अजून त्या चित्राकडे टक लाऊन बघत म्हणाला, “हे किती दुःखदायक आहे. मी म्हातारा व कुरूप होईन पण हे चित्र चिरतरुण राहील. जूनमधील या दिवसापेक्षा, वयाने ते कधीच वाढणार नाही. — जर उलटे झाले तर!”

हॉलवर्डलने विचारले, “तुला काय म्हणायचे आहे?”

”जर मी तरुण राहून, चित्र म्हातारे झाले तर? त्यासाठी — त्यासाठी मी काहीही देईन. खरंच, या जगात मी देऊ शकणार नाही असे काहीच नाही. मी माझा आत्माही देईन.”

लॉर्ड हेन्री म्हणाला, “बेसिल मला नाही वाटत, तुला हे बोलणे आवडेल.”

डोरिअन ग्रेने वळून त्याच्याकडे पाहिले, “तुझ्या मित्रापेक्षा तुला, तुझी कला जास्त आवडते.”

चित्रकार आश्चर्याने बघत राहिला. "डोरिअन असे का बोलला? काय झाले?" तो फार रागावलेला वाटत होता. "तुला नेहमीच हे चित्र आवडेल, पण मी किती काळपर्यंत तुला आवडेन? मी म्हातारा व्हायला लागेपर्यंत! लॉर्ड हेन्री वॉटनचे बरोबर आहे. जेव्हा माझे सौदर्य नष्ट होईल, तेव्हा मी माझे सर्वस्व गमावेन. मी म्हातारा होण्यापूर्वीच मला मारून टाकील."

हॉलवर्ड पांढरा फटक पडला. त्याने डोरिअनचा हात धरला व तो ओरडला, "डोरिअन. डोरिअन, असे बोलू नकोस. मला तुझ्यासारखा मित्र कधीच नव्हता आणि कधी मिळणारही नाही. तू एखाद्या चित्राचा कसा काय द्वेष करू शकतोस? कुठल्याही कलाकृतीपेक्षा, तू जास्त सुंदर आहेस."

"ज्याचे सौदर्य नष्ट होत नाही, अशा प्रत्येक गोष्टीचा मला द्वेष वाटतो. तू काढलेल्या माझ्या चित्राचा, मी द्वेष करतो. मला ज्याचा त्याग करावा लागेल अशी गोष्ट, त्याला का म्हणून राखता यावी?" त्याच्या डोळ्यातून कढत अश्रू येऊ लागले व त्याने सोफ्यावर अंग झोकून दिले.

चित्रकार रागाने बोलला, "तू हे केलेस, हेन्री."

लॉर्ड हेन्रीने त्याचे डोके हलवून म्हटले, "तोच खरा डोरिअन ग्रे आहे."

"हेन्री, माझ्या दोन चांगल्या मित्रांबरोबर एकाच वेळी मी वाद घालू शकत नाही. मी आतापर्यंत केलेल्या कामापैकी सर्वोत्तम कामाबद्दल द्वेष निर्माण होण्यास, तुम्ही दोघेही कारणीभूत आहात. मी ते नष्ट करतो. हातात सुरी धरून चित्राच्या टेबलाकडे हॉलवर्ड चाललेला, डोरिअन ग्रेने पाहिला व सोफ्यावरून उडी मारून, हॉलवर्डच्या हातातील सुरी घेऊन त्याने खोलीबाहेर फेकून दिली.

"बेसिल नको. त्याचा खून करू नकोस." तो किंचाळला.

"डोरिअन, शेवटी तुला माझे काम आवडले, हे बघून मला आनंद झाला. तुला ते आवडेल असे तुझ्या वक्तव्यावरून, वाटत नव्हते." चित्रकार थंडपणे बोलला.

"आवडले? मी तर त्याच्या प्रेमातच पडलो आहे. बेसिल, तो माझाच भाग आहे असे मला वाटते."

लॉर्ड हेन्री म्हणाला, "तुम्ही दोघेही मूर्ख आहात. आपण ते चित्र एका रात्रीपुरते विसरून जाऊ व एका थिएटरमध्ये जाऊ."

"लॉर्ड हेन्री, मला तुझ्याबरोबर थिएटरमध्ये यायला आवडेल." डोरिअन बोलला.

"आणि बेसिल, तू सुद्धा येशील ना?"

“मी येऊ शकत नाही. मला खूप काम आहे.” हॉलवर्ड बोलला.

“ठीक आहे. मिस्टर ग्रे, तू व मी बरोबर जाऊ.”

चित्रकाराने त्याचे ओठ मुडपले व चित्राकडे चालत गेला. “मी खऱ्या डोरिअनबरोबर रहातो.” तो दुःखाने म्हणाला.

# प्रकरण ३

## डोरिअन प्रेमात



लॉर्ड हेन्रीच्या मेफेअर येथील घराच्या छोट्याशा वाचनालयात, काही महिन्यानंतरच्या दुपारी डोरिअन ग्रे बसला होता. लॉर्ड हेन्री अजून आला नव्हता. तो नेहमीच उशिरा येई. डोरिअन ग्रे कंटाळला. एकदोनदा त्याने बाहेर निघून जायचा विचार केला.

शेवटी त्याला बाहेर पायरव ऐकू आला व दार उघडले गेले. तो बोलला, “किती उशीर, हेन्री.”

”इकडे बघ. मी हेन्री नाही, मिस्टर ग्रे. मी त्याची पत्नी आहे.” त्याने लगबगीने इकडेतिकडे पाहिले. तो भानावर आला. ”दिलगीर आहे. मला वाटले — “

“तुझ्या फोटोवरून, मी तुला चांगले ओळखते. मला वाटतं माझ्या नवऱ्याकडे, तुझे सतरा फोटो आहेत.”

“मिसेस हेन्री, सतरा?”

“कदाचित अठरा असतील आणि त्या रात्री मी तुला त्याच्याबरोबर, थिएटरमध्येही पाहिले. पण हेन्री आलाच.”

लॉर्ड हेन्रीने दोघांकडे हसून पाहिले. “डोरिअन, उशीराबद्दल क्षमस्व.”

“मला आता गेले पाहिजे. अच्छा मिस्टर ग्रे, मला वाटते तुम्ही दोघे खायला बाहेर जात आहात. मी देखील जाते. कदाचित परत भेटू.” मिसेस हेन्री म्हणाल्या.

“कदाचित, प्रिये.” लॉर्ड हेन्री म्हणाला व तिच्यामागे दार लावून घेतले. मग त्याने एक सिगरेट पेटवली व सोफ्यावर अडवारला. तो म्हणाला, “छान केशसांभार असलेल्या बाईशी, कधी लग्न करू नये, डोरिअन.”

“का हेन्री?”

“कारण त्या फार स्वप्नाळू असतात.”

“पण मला नाही वाटत की मी लग्न करीन. पण मी प्रेमात आहे, हे खरे.”

“तू कुणाच्या प्रेमात आहेस?” थोडा वेळ थांबून हेन्री म्हणाला.

“एका नटीच्या.” डोरिअन ग्रे बोलला.

“किती सामान्य!”

“हेन्री, तू तिला पाहिलेस तर असे म्हणणार नाहीस.”

“कोण आहे ती?”

“तिचे नाव आहे सिबल वेल.”

“मी कधी हे नाव ऐकले नाही.”

“कोणीच नाही. कदाचित एखादे दिवशी ऐकाल. ती कलाकार आहे.”

“माझ्या प्रिय मुला, कोणीच स्त्री कधी कलाकार नसते. कलेमधून सांगण्यासारखे, स्त्रियांजवळ काही नसतेच. पण त्या सांगतील ते मोहकपणे सांगतात. कधीपासून तू तिला ओळखतोस?”

“साधारण तीन आठवडे.”

“तू तिला कुठे भेटलास?”

"तुला सांगतो मी हेन्री, पण तू हसता कामा नयेस. काही झाले तरी जीवनाबद्दल सर्व काही जाणून घ्यायची ओढ, माझ्यात तूच निर्माण केलीस. तुझ्या भेटीनंतर अनेक दिवस मी सौदर्याचा शोध घेत, रस्त्यातून हिंडत होतो. मला एक छोटेसे जुनाट थिएटर लागेपर्यंत, मी पूर्वेच्या टोकाकडे चालत राहिलो – मी बघतो आहे, की ऐकताना तू हसत आहेस –"

"मी हसत नाही आहे, डोरिअन. तुझी गोष्ट चालू ठेव."

"रोमिओ व ज्युलिएट हे नाटक चालू होते. शेक्सपिअरचे नाटक इतक्या वाईट ठिकाणी बघण्याच्या विचाराने, प्रथम मी वैतागून गेलो आणि जेव्हा एक खूप म्हातारा माणूस रोमिओ म्हणून अवतीर्ण झाला, तेव्हा मी बाहेरच पडलो. पण नंतर मी ज्युलिएटला पाहिले. माझ्या आयुष्यात मी पाहिलेल्या गोष्टींमधील ती सर्वात सुंदर गोष्ट होती."

"तू तिला कधी भेटलास?"

"त्यापुढील रात्री व त्याच्यापुढील रात्री. मी तिथे परत गेलो. तिसऱ्या रात्री मी तिच्यासाठी थिएटरबाहेर थांबलो."

"ती कशी आहे?"

"सिबल? ती सभ्य व लाजरी आहे. ती फक्त सतरा वर्षांची आहे आणि तिच्यात एक मूल दडलेले आहे. ती मला म्हणाली की मी, एखाद्या राजकुमारासारखा दिसतो. मला तुला राजपुत्र मोह्क, (प्रिन्स चार्मिंग) असेच म्हटले पाहिजे."

"तुझी स्तुती कशी करायची ते मिस सिबलला, चांगले ठाऊक दिसते."

"तुम्ही तिला समजून घेत नाही आहात. तिला असे वाटते, की मी शेक्सपिअरच्या एखाद्या व्यक्तीचित्रा सारखा आहे. तिला आयुष्याबद्दल काहीच माहिती नाही. जगात मी फक्त एकाच गोष्टीची पर्वा करतो, ती म्हणजे सिबल."

"तरीच तू हल्ली माझ्याबरोबर जेवण घेत नाहीस. तेच कारण आहे ना? मला वाटले की ते काहीतरी अदभुतरम्य असेल."

डोरिअन म्हणाला, "आम्ही रोज एकत्र खातो."

"म्हणूनच तू नेहमी उशिरा येतोस." इति लॉर्ड हेन्री

"मला सिबलचे नाटक बघायचे असते ना!" तो तक्रारीच्या सुरात बोलला.

"आज रात्री माझ्याबरोबर जेवण घेशील का, डोरिअन?"

त्याने मान हलवत म्हटले, "आज रात्री ती ॲफिलीया आहे व उद्या रात्री ती ज्युलिएट असेल."

"ती सिबल वेल कधी असते?"

"कधीच नाही."

"हे चांगले आहे."

"किती भयानक आहेस तू! पण तू तिला बघितलेस तर, तू वेगळा विचार करशील. उद्या रात्री तू आणि बेसिलने येऊन तिला बघावे अशी माझी इच्छा आहे. तुम्हाला ती नक्कीच विलक्षण वाटेल, अशी माझी खात्री आहे."

"ठीक आहे मग, उद्या संध्याकाळी. तत्पूर्वी तू बेसिलला भेटशील का? की मी त्याला कळवू?"

"माझा आवडता बेसिल! आठवडाभरात मी त्याला भेटलो नाही. काही दिवसांपूर्वी त्याने, माझे चित्र माझ्याकडे पाठवले तरीही! खरंच, किती कृतघ्न आहे मी! मला ते चित्र बघायला खूप आवडते. तूच त्याला कळव. मला एकट्याला त्याला भेटायचे नाही आहे. तो अशा गोष्टी बोलतो, की मला राग येतो. तो मला सदुपदेश करतो."

लॉर्ड हेन्री हसला. "लोकाना स्वतःला ज्याची जरुरी असते, असा उपदेश दुसऱ्याला द्यायला फार आवडते."

"ओहो! बेसिल चांगला मनुष्य आहे. पण कला व सौदर्य या बाबतीत त्याला खरंच काही कळते असे मला वाटत नाही. आपली ओळख झाली ना हेन्री, तेव्हाच मला याचा शोध लागला."

"माझ्या प्रिय मुला, बेसिल काय करतो बरंका, त्याच्यामध्ये जी जी अदभुतरम्य गोष्ट आहे ना, ती तो त्याच्या कामात ओततो."

"हेन्री, आता मला गेले पाहिजे .माझी ज्युलिएट, माझी वाट बघत असेल. उद्याचे विसरू नकोस. बाय. बाय."

त्याला नव्याने कळलेल्या गोष्टीबद्दल डोरिअन तेथून गेल्यावर, लॉर्ड हेन्री विचार करू लागला. खरे पहाता त्याला डोरिअन ग्रेमध्ये जितकी रुची वाटू लागली होती, तितकी अगदी फार थोड्या लोकांमध्ये त्याला निर्माण झाली होती. तरीही त्या नटीच्या नादी लागल्याने,

तो डोरिअनवर चिडला नाही किंवा मत्सरीदेखील झाला नाही. त्याला त्यामुळे आनंदच झाला. त्यामुळे हा मुलगा समजून घेण्यास जास्तच रुचीपूर्ण झाला आहे, असे त्याला वाटले.

त्या रात्री जेव्हा तो जेऊन घरी आला, तेव्हा लॉर्ड हेन्रीने दरवाज्याजवळील टेबलावर, एक लिफाफा पडलेला पाहिला. त्याने तो उघडला. डोरिअन ग्रे व सिबल वेल विवाहबद्ध होत असल्याचे त्याने वाचले.

## प्रकरण ४

## सिबल वेलचे प्रणयाराधन

"बेसिल, मला वाटते, तुला बातमी समजली असेल." दुसऱ्या दिवशी संध्याकाळी लॉर्ड हेन्री म्हणाला, ब्रिस्टॉल हॉटेलच्या भोजन कक्षात ते बसले होते.

आपली कोट व टोपी वेटरला देत, कलाकार उद्गारला, "नाही हेन्री."

त्याचे निरीक्षण करत लॉर्ड हेन्री म्हणाला, "डोरिअन ग्रे लग्न करतो आहे."

हॉलवर्डने कपाळाला आठ्या घालत विचारले, ""डोरिअन लग्न करतो आहे? अशक्य!"

"हे शंभर टक्के खरे आहे."

"कोणाबरोबर?"

"एका लहानशा नटीबरोबर."

"पण अशा कुणातरीबरोबर लग्न करणे, हे त्याच्यासाठी चुकीचे आहे."

"बेसिल, जर तुला या मुलीबरोबर त्याचे लग्न व्हावे असे वाटत असेल, तर तू त्याला तसे सांग. मग तो ते नक्की करेल. जेव्हा मनुष्य एखादी मूर्खपणाची गोष्ट करतो तेव्हा, ती नेहमी एखाद्या चांगल्या कारणा साठीच करतो."

"हेन्री, मी अशी आशा करतो, की ही मुलगी चांगली आहे."

लॉर्ड हेन्री म्हणाला. "अरे ती चांगलीच आहे. ती सुंदर आहे. डोरिअन म्हणतो ती सुंदर आहे व अशा गोष्टीतले त्याचे मत सहसा चुकत नाही. दुसऱ्यामधले सौंदर्य त्याला, तुझ्या व्यक्तिचित्रामुळे समजू लागले आहे. तो मुलगा विसरला नसेल, तर आज रात्री आपण तिला बघणार आहोत."

"हेन्री, पण डोरिअन, एखाद्या नटीशी कसे काय लग्न करू शकतो? हे विचित्र आहे." त्याचा ओठ चावत, खोलीत वरखाली फेऱ्या मारत, चित्रकार करवादला.

"ज्युलिएटचे काम करणाऱ्या, एका सुंदर अभिनेत्रीच्या प्रेमात डोरिअन पडला आहे. त्याने तिला लग्नाबद्दल विचारले. मला वाटते, डोरिअन ग्रे या मुलीबरोबर लग्न करून सहा महिने तिचे प्रणयाराधन करेल. नंतर अचानक तो दुसऱ्या स्त्रीच्या आकर्षणात सापडेल."

"हेन्री, तू बोलतो आहेस त्यातले एकही अक्षर तुझ्या मनात नाही आहे. मला माहिती आहे की खरे तर तुला, डोरिअन ग्रेच्या आयुष्याचा विचका व्हायला नको आहे. तू ढोंग करतोस, त्यापेक्षा तू बरा आहेस."

लॉर्ड हेन्री हसून बोलला, "आपल्याला स्वतःचीच भीती वाटते म्हणून आपण दुसऱ्याचे परमकल्याण इच्छितो. पण हा डोरिअन आलाच. माझ्यापेक्षा तो तुला जास्त चांगले सांगू शकेल."

"माझ्या प्रिय हेन्री व माझ्या प्रिय बेसिल, तुम्ही दोघांनीही माझे अभिनंदन केले पाहिजे." त्याचा कोट काढून प्रत्येकाशी हस्तांदोलन करत मुलगा म्हणाला. "मी कधीच एवढा आनंदी नव्हतो. अर्थात हे अचानक झाले. — सर्व उत्तम गोष्टी अशाच होतात. आणि तरीही मला वाटते, मी आयुष्यभर ज्याची प्रतिक्षा केली, तीच ही गोष्ट आहे."

हॉलवर्ड म्हणाला, "मला अशी आशा आहे, की तू नेहमी खूप सुखी राहशील, डोरिअन. पण तू मला सांगितले का नाहीस? हेन्रीला तू सांगितलेस."

"त्यात विशेष सांगण्यासारखे काही नाही." डोरिअन उत्तरला. "काल रात्री मी तिचे नाटक बघायला परत गेलो. नंतर आम्ही एकत्र बसलो होतो तेव्हा, तिच्या डोळ्यात एक वेगळीच चमक आली. यापूर्वी मी कधी असे पाहिले नव्हते. आम्ही एकमेकांचे चुंबन घेतले. त्या क्षणी मला काय वाटले, ते मी तुला वर्णन करून सांगू शकत नाही."

"तू तिला आज भेटलास का?" लॉर्ड हेन्रीने विचारले.

डोरिअन ग्रेने नकारदर्शक मान हलवली. "मी तिला शेक्सपिअरच्या वनात सोडले. त्याच्या बागेत ती आत्ता असेल."

"नेमक्या कुठल्या क्षणी तू लग्न हा शब्द वापरलास, डोरिअन? आणि तिने कसे उत्तर दिले? कदाचित तू हे सर्व विसरला असशील."

"माझ्या प्रिय हेन्री, मी काही कामासाठी तिला भेटलो नव्हतो. मी तिला तिच्यावर प्रेम करतो असे सांगितले. तिच्यापुढे मला अख्या जगाची, काहीही पर्वा नसल्याचेही सांगितले."

'"पण, माझ्या प्रिय डोरिअन — "

हॉलवर्डने लॉर्ड हेन्रीच्या खांद्यावर हात ठेवला. "नको हेन्री, तू डोरिअनला नाराज करू नकोस. तो इतर माणसांसारखा नाही. तो कुणाला कधी दुखावणार नाही."

डोरिअन ग्रेने स्मित केले. “मी जेव्हा सिबल वेलबरोबर असतो, तेव्हा मी तू मला जे शिकवले आहेस, त्यावर काहीच विश्वास ठेवत नाही. मी तुझ्या भयानक विचित्र कल्पना विसरून जातो.”

“पण त्या आहेत. — सुख — ही एकच गोष्ट, कल्पना करण्याजोगी आहे.” त्याच्या खर्जातील मधुर आवाजात तो उत्तरला. “आपण जेव्हा आनंदी असतो, तेव्हा आपण चांगले असतो, पण आपण चांगले असतो, तेव्हा नेहमी आनंदी असतोच असे नाही.”

डोरिअन ग्रे किंचाळला, ‘सुख हे काय आहे, ते मी जाणतो. कुणाची तरी आराधना करणे.”

“स्वतःची कुणीतरी आराधना करण्यापेक्षा ते नक्कीच बरे आहे”

‘हेन्री, तू भयानक आहेस. तू मला इतका का आवडतोस, मला माहिती नाही. चल, आपण खाली थिएटरमध्ये जाऊ. जेव्हा तू सिबलला बघशील, तेव्हा तुझ्या कल्पना बदलतील.”

त्यांनी उठून त्यांचे कोट घातले. चित्रकार शांत व विचारी वाटत होता. त्याला वाईट वाटत होते. पूर्वी डोरिअन ग्रे जसा होता, तसा आता तो परत कधीच असणार नव्हता. जीवन त्यांच्यामध्ये उभे राहिले होते.

जेव्हा ते थिएटरमध्ये आले तेव्हा हॉलवर्डला असे वाटले की तो खूप वर्षांनी म्हातारा झाला आहे.

## प्रकरण ५

## डोरिअन सिबलपासून अलग

त्या रात्री थिएटरमध्ये गर्दी होती. भयंकर गरम होत होते आणि तरूण मंडळी त्यांच्या आसनावरून ओरडून एकमेकांशी बोलत होती. स्त्रिया जोरात हसत होत्या. भयंकर कोलाहल माजला होता. लोक संत्री खात होते. बाटल्यातून पेय पित होते.

"काय पण जागा शोधली आहे, योग्य मुलगी पहाण्यासाठी!" लॉर्ड हेन्री उद्गारला.

"हो." डोरिअन ग्रे म्हणाला. "इथेच ती मला सापडली. तुम्ही तिला ज्युलिएट म्हणून पहाल, तेव्हा सर्व विसराल. हे भिकार लोक तिच्या आगमनानंतर एकदम शांत बसतील."

"मला कळते आहे डोरिअन, तुला काय म्हणायचे आहे ते. आणि या मुलीवर माझा विश्वास आहे. तू प्रेम करत असलेली कुठलीही गोष्ट, विलक्षण असणार." चित्रकार बोलला.

डोरिअन ग्रे उत्तरला, "आभारी आहे बेसिल, तू मला समजून घेशील, हे मला माहिती होते. मी जिला माझे आयुष्य अर्पण केले आहे, ती मुलगी तुला आता दिसेल. माझ्यातील जे चांगले आहे, ते सर्व जिला मी दिले आहे, अशी मुलगी."

मग सिबल अवतरली. गर्दी तिच्या नावाचा पुकारा करून, ओरडू लागली. खरंच, ती दिसायला सुंदर होती. — असा लॉर्ड हेन्रीने विचार केला. बेसिल हॉलवर्ड उत्तेजित होऊन, तर डोरिअन स्वप्नात असल्याप्रमाणे तिच्याकडे टक लाऊन बघत राहिले.

"सुंदर. मोहक." लॉर्ड हेन्री ओरडला.

पंधरा मिनिटांनी लॉर्ड हेन्री हॉलवर्डच्या कानात कुजबुजला, "मी आतापर्यंत पाहिलेल्या मुलींपैकी, ती एक अति सुंदर मुलगी आहे. पण ती वाईट अभिनेत्री आहे."

तिला बोलताना ऐकून डोरिअन ग्रेचा चेहरा पांढरा फटक पडला. आजच्या रात्री, ती काही वेगळीच होती. ती आता ती ज्युलिएट नव्हती, तर अशी एक वाईट अभिनेत्री होती, की जिला शेक्सपिअरचे शब्द उमजत नव्हते.

गर्दी सुद्धा कंटाळून मोठ्याने बोलू लागली. फक्त एकाच व्यक्तीला हे जाणवले नाही. ती म्हणजे ती अभिनेत्रीच.!

लॉर्ड हेन्रीने खुर्चीवरून उठून आपला कोट घातला. "ती सुंदर आहे, डोरिअन. पण ती अभिनय करू शकत नाही. चला. जाऊया."

"मी शेवटपर्यंत थांबणार आहे. मी तुमची एक संध्याकाळ फुकट घालवली, म्हणून तुमची खरंच क्षमा मागतो." मुलगा थंड स्वरात म्हणाला.

हॉलवर्ड म्हणाला, "माझ्या प्रिय डोरिअन, मिस वेल आजारी आहे. आम्ही परत एखाद्या रात्री येऊ."

"बेसिल व माझ्याबरोबर क्लबमध्ये ये. आपण सिगरेट ओढून सिबल वेलच्या सुंदरतेच्या नावाने पेय घेऊ. ती सुंदर आहे. अजून काय पाहिजे?"

"चालू लाग हेन्री. मला एकट्याला राहू दे. माझे हृदय भग्न पावत आहे. तुम्हाला कळत नाही का?" मुलगा किंचाळला.

हॉलवर्ड व लॉर्ड हेन्री थिएटरमधून बाहेर पडले तेव्हा डोरिअनचे डोळे उष्ण अश्रुंनी डबडबलेले होते.

जेव्हा तो त्यातून बाहेर पडला, तेव्हा सिबल वेलला भेटायला धावला. तिच्या चेहऱ्यावरील असामान्य आनंदासहीत, ती मुलगी एकटीच उभी होती. "किती वाईट अभिनय केला मी आज, डोरिअन!" ती खिन्नतेने म्हणाली.

तिच्याकडे रोखून बघत तो उद्गारला, "भयानक. फारच भयानक होता तो. तू आजारी आहेस का? तू मला असा त्रास सहन करायला, का लावते आहेस?

मुलगी हसली. "डोरिअन, तुला कळत नाही का?"

"काय कळत नाही?" तो रागाने विचारता झाला.

"आज रात्री मी इतका वाईट अभिनय का केला? मी सदैव वाईट असेन का? परत मी चांगला अभिनय करू शकणार नाही का?"

"तू आजारी आहेस असे मला वाटते. तू आजारी असताना काम करू नयेस. माझे मित्र कंटाळले. मी कंटाळलो."

ती किंचाळली, "डोरिअन. डोरिअन, तुझी ओळख होण्यापूर्वी, अभिनय ही माझ्या आयुष्यात एक महत्वाची गोष्ट होती. माझे खरे आयुष्य, मी थिएटरमध्येच जगत होते. मला तेच सगळे, खरे वाटत होते. आज रात्री मला प्रथमच आयुष्यात असे जाणवले, मी प्रेमाचे नाटक

करत होते. पण आपले प्रेम, हेच खरे प्रेम आहे. मला तुझ्याबरोबर घेऊन चल. डोरिअन, मला आता अभिनेत्री बनून मुळीच रहायचे नाही."

त्याने सोफ्यावर अंग झोकून दिले व त्याचा चेहरा वळवला. "तू माझे प्रेम मारून टाकलेस." तो शांतपणे म्हणाला व उडी मारून दाराजवळ गेला. "अरे बापरे, तुझ्यावर प्रेम करणारा मी किती वेडा होतो! किती मूर्ख होतो मी! आता तू माझी कोणीही नाहीस. मी तुला पुन्हा कधीही भेटणार नाही. तुझा विचारही मी कधी करणार नाही. मी तुझ्याशी यापुढे कधी बोलणारही नाही."

ती मुलगी पांढरी फटक पडली. "डोरिअन, तू हे मनापासून बोलतो आहेस, की अभिनय करतो आहेस?" त्याच्या खांद्यावर हात ठेवत ती कुजबुजली.

त्याने तिला मागे ढकलले. "मला हात लाऊ नकोस." तो ओरडला व वळून खोलीबाहेर पडला.

रात्रभर लंडनच्या रस्त्यांवरून फिरून सूर्योदयानंतर तो घरी आला. तो वाचनालयात शिरल्याबरोबर, त्याला हॉलवर्डने काढलेले त्याचे चित्र दिसले. त्याने आश्चर्याने त्याकडे टक लाऊन पाहिले व तो त्याच्या झोपायच्या खोलीकडे गेला. त्याने त्याचा कोट काढला आणि पलंगाजवळ उभा राहिला. थोड्या वेळाने तो परत चित्राजवळ आला व ते जवळून पाहू लागला. मिणमिण प्रकाशात चेहरा थोडा बदलल्यासारखा वाटला. आता तोंड दुष्ट दिसू लागले. हे खरोखर विचित्र होते.

त्याने खिडकीजवळ जाऊन पडदे उघडले. उजेडामुळे खोलीचे स्वरूप बदलले, पण चित्राचा चेहरा तसाच राहिला. खरे तर सूर्यप्रकाशामुळे चेहरा, अधिकच दुष्ट दिसू लागला.

तो परत झोपायच्या खोलीत गेला, व लॉर्ड हेन्रीकडून भेट मिळालेला छोटा आरसा घेऊन आला. त्यात त्याने त्याच्या खऱ्या चेहऱ्याकडे पाहिले, तर त्यात दुष्ट्पणाचे नामोनिशाणही नव्हते. याचा अर्थ काय होता?

त्याने एका खुर्चीत स्वतःला झोकून दिले व विचार करू लागला. चित्र काढून पुरे झाले त्या दिवशी, बेसिल हॉलवर्डच्या घरी तो काय म्हणाला होता ते त्याला एकदम आठवले. हो. आता ते त्याला, पूर्णपणे आठवले. त्याने असे सुचवले होते, की चित्र म्हातारे व्हावे, म्हणजे त्याला स्वतःला तरूण रहाता येईल. पण ही गोष्ट अशक्य होती. त्याबद्दल विचार करणे सुद्धा, भयानक होते आणि तरीही चित्र त्याच्या समोरच होते. त्यात त्याचे तोंड दुष्ट दिसत होते.

दुष्टपणा! तो दुष्टपणे वागला होता का? नाही. सिबल वेलबद्दल आता कशाला विचार करायचा? आता ती त्याच्या दृष्टीने कोणीही नव्हती.

पण चित्र? त्याबद्दल तो काय म्हणू शकत होता? ते त्याच्या आयुष्याची गोष्ट सांगत होते, त्याची गुपिते जाणत होते. त्याने त्याला, स्वतःच्या सौदर्यावर प्रेम करायला शिकवले होते. ते त्याला, स्वतःच्या आत्म्याचा द्वेष करायला शिकवेल का? तो परत त्या चित्राकडे बघेल का?

त्याने स्वतःला वाचवले पाहिजे. त्याने पुन्हा लॉर्ड हेन्रीला भेटता कामा नये. त्याने परत सिबलकडे गेले पाहिजे. तिच्याशी लग्न केले पाहिजे. पुन्हा तिच्यावर प्रेम करायचा प्रयत्न केला पाहिजे. त्याच्यापेक्षा, तिला जास्त त्रास झाला होता. तो तिच्याशी दुष्टपणे व स्वार्थीपणे वागला होता. ते एकत्र नक्की सुखी होतील. तिच्याबरोबरचे त्याचे आयुष्य सुंदर, व खरेखुरे चांगले असेल. तो खुर्चीतून उठला व चित्र झाकून ठेवले. “किती भयानक!” तो स्वतःशी म्हणाला. खिडकीजवळ जाऊन त्याने ती उघडली. जेव्हा त्याने बाहेर गवतावर पाउल टाकले, तेव्हा दीर्घ सुस्कारा टाकला. त्याने फक्त सिबलचाच विचार केला. त्या बागेतील गाणारे पक्षी तिच्याबद्दल फुलाना सांगत होते.

# प्रकरण ६

## प्रेमाचा दुःखान्त



दुसऱ्या दिवशी जवळजवळ एक वाजता, तो जागा झाला. त्याच्या नोकराने त्याला चहा आणला. त्यासोबत काही पत्रेही होती. त्यापैकी एक लॉर्ड हेन्रीकडून आले होते. ते त्याने सकाळीच कुणाबरोबर तरी पाठवले होते. डोरिअनने ते बाजूला ठेऊन दिले. पूर्ण आनंदाने, तो वाचनालयात न्याहारीसाठी गेला. त्याने उघडी खिडकी व झाकलेले चित्र पाहिले. ते सर्व खरे होते का? की ते एक स्वप्न होते? पण त्याला तो दुष्ट चेहरा, स्पष्टपणे आठवत होता.

डोरिअन ग्रेने, त्याच्या नोकराला दूर पाठवून दिले. सर्व दारे बंद करून घेतली. मग त्याने चित्रावरील पडदा दूर केला. आणि स्वतःला समोर उभे राहून, नीट न्याहाळले. ते खरे होते. चित्र बदलले होते. काय करावे, कसा विचार करावा, हे तासनतास त्याला कळत नव्हते.

शेवटी त्याने टेबलापाशी जाऊन, तो प्रेम करत असलेल्या मुलीला भावपूर्ण पत्र लिहिले. तो ज्या भयानक गोष्टी तिला बोलला, त्याबद्दल तिने आपल्याला माफ करावे, अशी त्याने विनंती केली.

अचानक त्याला दारावर टकटक ऐकू आली. बाहेर लॉर्ड हेन्रीचा आवाज ऐकू आला. "माझ्या लाडक्या मुला, मला तुला भेटलेच पाहिजे. मला पटकन आत घे."

त्याने काही उत्तर दिले नाही. तो स्तब्ध राहिला. टकटक सुरु राहिली. जोर वाढला. हो. लॉर्ड हेन्रीला आत घेणेच बरे होते. तो सुरु करणार असलेले नवे आयुष्य, त्याने त्याला स्पष्ट करून सांगितले असते. त्याने उडी मारून चित्र झाकले व दार उघडले.

"डोरिअन, या सर्व प्रकाराबद्दल मला खेद होतो." आत येत लॉर्ड हेन्री म्हणाला. "पण आता त्याबद्दल जास्त विचार करू नकोस."

"सिबल वेलबद्दल असे तुला म्हणायचे आहे का?" मुलाने विचारले.

"अर्थातच" खाली बसत व सावकाश त्याचे मोजे काढत, लॉर्ड हेन्री उत्तरला. "हे भयानकच झाले. पण त्यात तुझा काही दोष नाही. मला सांग, काल तो प्रकार झाल्यावर तू तिच्या मागोमाग जाऊन तिला भेटलास का?"

"हो."

"मला वाटलेच होते. तुझा तिच्याबरोबर, काही वाद झाला का?"

"मी फार दुष्टाव्याने वागलो, हेन्री. पण आता ठीक आहे. जे झाले त्याबद्दल मला आता वाईट वाटत नाही. त्यामुळे मला स्वतःबद्दल जास्त जाणून घ्यायचा, धडा मिळाला."

"अरेरे डोरिअन, तू त्या सर्व गोष्टीकडे अशा दृष्टीकोनातून बघतोस, हे चांगले आहे."

"मला चांगले व्हायचे आहे, हेन्री .मला माझा आत्मा कुरूप व्हायला नको आहे. मी सिबल वेलशी लग्न करणार आहे. "

"सिबल वेलशी लग्न?" उभा राहून त्याच्याकडे आश्चर्याने बघत, लॉर्ड हेन्री किंचाळला. "पण माझ्या प्रिय डोरिअन — "

"हो हेन्री, मला माहिती आहे तू काय म्हणणार आहेस. लग्न करण्याविषयी काही उलटसुलट! ते बोलू नकोस. सिबल माझी पत्नी होणार."

"तुझी पत्नी? डोरिअन, — तुला माझे पत्र मिळाले नाही का? मी तुला आज सकाळी लिहिले होते."

"तुझे पत्र? हो. हो. मला आठवले. मी ते अजून वाचले नाही."

"तुला अजून काहीच माहिती नाही तर?"

"तुला काय म्हणायचे आहे?"

लॉर्ड हेन्रीने खोलीत येरझऱ्या घातल्या व डोरिअन ग्रेजवळ बसला.

त्याचे दोन्ही हात हातात घेऊन, त्याने धरून ठेवले व म्हणाला, "डोरिअन, सिबल वेल देवाघरी गेली, हे कळवण्यासाठी मी तुला पत्र लिहिले होते."

मुलाच्या ओठातून दुःखाची किंकाळी बाहेर पडली. त्याने गुडघ्यात तोंड लपवले. "सिबल देवाघरी गेली? मेली? नाही, हे खरे नाही. हे धडधडीत खोटे आहे."

लॉर्ड हेन्री म्हणाला, "हे खरे आहे डोरिअन, हे सर्व सकाळच्या वृत्तपत्रात आले आहे. पोलीस प्रश्न विचारतील. या सर्व प्रकरणात तुझे नाव गोवले जायला नको. अशा गोष्टीने माणूस पॅरीसमध्ये किर्ती मिळवतो, पण लंडनमधील सभ्य गृहस्थासाठी, हे संकट आहे. थिएटरमध्ये कुणाला तुझे नाव माहिती नसेल, अशी मी आशा करतो. तसे असेल, तर ठीक आहे. तिच्या खोलीकडे जाताना तुला कोणी पाहिले का?"

काही क्षण डोरिअनने उत्तर दिले नाही. शेवटी विचित्र आवाजात तो म्हणाला, "हेन्री, तू काय म्हणालास? पोलीस प्रश्न विचारत आहेत? तुला काय म्हणायचे आहे? काय सिबलने -? अरेरे! हेन्री हे फार क्लेशकारक आहे."

"जरी वरवर असे म्हटले गेले असले, तरी हे खरे नसणार. थिएटरमध्ये वापरण्यात येणारे काहीतरी भयंकर तिने गिळले असणार."

"हेन्री, हे सर्व भयानक आहे." मुलगा किंचाळला.

"हो. अर्थातच हे दुःखदायक आहे. पण त्याचा, तुझ्याशी काही संबंध नाही. चल, माझ्याबरोबर जेवण घे. नंतर आपण थिएटरवर जाऊ."

"म्हणजे मी सिबल वेलचा खून केला तर!" डोरिअन ग्रे अर्धवट स्वतःशी म्हणाला. "तरी गुलाबाच्या फुलाचे सौदर्य अबाधित आहे. बागेत पक्षी अजून आनंदाने गात आहेत. आणि आज रात्री मी तुझ्याबरोबर जेवण घेईन व नंतर आपण थिएटरवर जाऊ. आयुष्य किती असामान्य आहे! माझे पहिले भावनामय प्रेमपत्र, मृत मुलीला लिहिले होते. तरीपण — मला असे कसे होते आहे ? मला या दुःखान्त गोष्टीचे जेवढे वाईट वाटायला पाहिजे तेवढे वाटत नाही. पण मी हृदयशून्य, भावनारहित आहे, असे मला वाटत नाही. तुला वाटते?"

डोरिअन, गेल्या पंधरा दिवसात तू हृदयशून्य व्हावेस, अशा अनेक मूर्खपणाच्या गोष्टी केल्या आहेस.“ त्याच्या गोड, पण उदास हास्यासहित, लॉर्ड हेन्री उत्तरला.

मुलाने कपाळाला आठ्या घातल्या. “मला हे स्पष्टीकरण आवडले नाही, हेन्री. पण तू मला हृदयशून्य म्हणाला नाहीस, हे मला आवडले.”

“तुझ्या प्रेमाखातर त्या स्त्रीने आत्महत्या केली, हे फार सुंदर आहे.” लॉर्ड हेन्री बोलला.

तिथे शांतता पसरली. खोलीत काळोख दाटू लागला. थोड्या वेळाने, डोरिअन ग्रेने वर बघितले. “तू मला किती बरोबर ओळखतोस! पण आता काय घडून गेले याबद्दल, आपण बोलणार नाही आहोत. हे काहीतरी आश्चर्यकारक आहे, एवढेच. आता मी तयार होतो. हेन्री, मला काही खावेसे वाटत नाही. पण नंतर थिएटरमध्ये मी तुझ्याबरोबर येईन.”

लॉर्ड हेन्रीने त्याच्यामागे दार लाऊन घेतल्यावर, डोरिअन चित्राकडे धावला व त्यावरील आवरण खेचून काढले. – नाही. त्या चित्रात अजून काही बदल झालेला नव्हता. सिबल वेलच्या मरणाची बातमी त्याला कळण्याअगोदर, चित्राला कळली होती. तिच्या आठवणीनी, त्याच्या डोळ्यात अश्रू आले. त्याने ते निपटून काढले व परत चित्राकडे बघितले.

त्याला असे वाटले, की आता निवड करायची वेळ आली आहे. किंवा कदाचित, त्याने आधीच ठरवले असावे का? हो. आयुष्याने त्याच्यासाठी ते ठरवून टाकले होते. त्याला वाटणारी लाज, चित्र वाहणार होते. ते ठरून गेले होते.

एक तासानंतर, तो थिएटरवर होता व लॉर्ड हेन्री त्याच्या जवळ बसला होता.

# प्रकरण ७

## जे झाले ते झाले



तो दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता घेत असताना, बेसिल हॉलवर्ड खोलीत अवतीर्ण झाला.

"तुला भेटून खरंच आनंद झाला, डोरिअन" तो बोलला. "मी काल तुला फोन केला होता, तेव्हा कळले की तू थिएटरवर गेला आहेस. अर्थात मला माहिती होते की, हे शक्य नाही. एका दुःखद गोष्टीनंतर दुसरी दुःखद गोष्ट घडते की काय अशी काळजी वाटून, माझी संध्याकाळ भयानक गेली. या सर्व गोष्टीमुळे माझे हृदय कसे शतशः विदीर्ण झाले आहे, हे मी तुला सांगू शकत नाही. तू त्या मुलीच्या आईला जाऊन भेटलास का? ती या सर्व प्रकरणाबद्दल काय म्हणाली?"

डोरिअन ग्रे बोलला, "माझ्या प्रिय बेसिल, मला माहिती नाही. मी थिएटरवर होतो." तो फार कंटाळलेला दिसला.

"तू थिएटरवर गेलास? जिथे सिबल वेल मरून पडली होती, त्या थिएटरवर तू गेलास?" हॉलवर्डने सावकाशीने विचारले.

"थांब बेसिल. मला काही ऐकायचे नाही." झटकन गुडघ्यात डोके खुपसत डोरिअन किंचाळला. "तू अशा गोष्टी बोलू नयेस. जे झाले ते झाले. जे घडून गेले ते गेले."

"तू कालला भूतकाळ म्हणतोस? डोरिअन, हे भयानक आहे. तुझ्यात काहीतरी कारणाने, पूर्ण परिवर्तन झाले आहे. माझ्या चित्रातील आश्चर्यकारक मुलासारखा तू हुबेहूब दिसतोस, पण तुझे हृदय गायब आहे. हा सर्व, हेन्रीचा परिणाम आहे. मला सरळ दिसते आहे."

मुलगा खिडकीजवळ गेला व काही क्षण बाहेर बघत राहिला.

"हेन्रीने मला खूप गोष्टी शिकवल्या आहेत. बेसिल. तू मला फक्त माझ्या सौंदर्यावर प्रेम करायला शिकवलेस."

"त्याबद्दल मी खरंच दिलगीर आहे, डोरिअन."

"बेसिल, मला कळत नाही की तुला काय म्हणायचे आहे? तुला काय हवे आहे?"

"मी ज्या डोरिअन ग्रेचे चित्र काढले, तो मला हवा आहे." चित्रकार विषादाने म्हणाला.

जवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवत मुलगा म्हणाला, "तू फार उशीर केलास. काल मी जेव्हा सिबल वेलने आत्महत्या केल्याचे ऐकले — "

"आत्महत्या? अरे बापरे! हे सर्व खरे आहे?" हॉलवर्डने रडवेल्या सुरात विचारले.

"माझ्या प्रिय बेसिल, अर्थातच तिने आत्महत्या केली."

त्या वयस्क माणसाने, हाताच्या ओंजळीत तोंड खुपसले व शांत आवाजात तो म्हणाला, "काय भयंकर आहे हे!"

"नाही." डोरिअन ग्रे म्हणाला. "त्यात काहीही भयंकर नाही. आपल्या काळातील, ही मोठी अदभुतरम्य दुःखान्त कहाणी आहे. मला माहिती आहे, मला असे बोलताना बघून, तुला आश्चर्य वाटते आहे. तुला मी माहिती होतो, तेव्हा मी एक मुलगा होतो. आता मी मोठा माणूस आहे. माझ्याकडे नवीन विचार, कल्पना, वासना आहेत."

"पण डोरिअन — "

“मी बदललो आहे. पण तरीही तुला, पूर्वीइतकाच आवडायला हवा. अर्थात हेन्रीकडे, माझा खूप ओढा आहे पण त्याच्यापेक्षा तू चांगला आहेस. आपण एकत्र किती आनंदात होतो! बेसिल मला सोडून जाऊ नकोस, आणि माझ्याशी वाद घालू नकोस. मी जसा आहे तसा आहे.”

चित्रकाराला विचित्र रित्या, दुःख झाले. डोरिअन ग्रे त्याच्यासाठी, असामान्यपणे महत्वाचा होता. त्या मुलाने, त्याच्या कलेला कलाटणी दिली होती. कदाचित सिबल वेलसंबंधीचे त्याचे दुष्ट उद्गार, त्याच्या केवळ आत्ताच्या मनस्थितीचे द्योतक असतील. ते टिकणार नाहीत. त्याच्यामध्ये खूप काही चांगलेही आहे.”

उदासपणे हसून तो म्हणाला, “ठीक आहे, डोरिअन. मी या भयानक गोष्टीबद्दल तुझ्याशी परत बोलणार नाही. फक्त या प्रकरणात तुझे नाव गोवले जायला नको. पोलिसांनी तुला भेटायला बोलावले आहे का?”

डोरिअन मान हलवत बोलला, “नाही. त्याना माझे नावदेखील माहिती नाही.”

“तिला तुझे नाव ठाऊक नव्हते?”

“फक्त माझे पहिले नाव व तेदेखील तिने कुणाला सांगितले नसेल .तिने घरी मी ‘राजपुत्र मोहक’ आहे असे सांगितले होते. हा तिचा चांगुलपणा होता, बेसिल. तू माझ्यासाठी सिबलचे चित्र काढायला हवेस. फक्त काही चुंबनांच्या आठवणींपेक्षा, अजून काही तिचे मला मिळाले तर, मला आवडेल.”

“डोरिअन, मी काहीतरी करायचा प्रयत्न करीन. पण तू परत येऊन माझ्याकडे बसले पाहिजेस. मला तुझ्याशिवाय चांगले काम करता येत नाही.”

“मी तुझ्याकरता आता, कधीच बसू शकणार नाही, बेसिल. ते अशक्य आहे.”

“माझ्या प्रिय मुला, हा काय मूर्खपणा आहे! मी तुझ्यासाठी इतके केले, ते तुला आवडले नाही का? ते सर्व कुठे गेले? ते तू झाकून का ठेवले आहेस? मला ते बघू दे. माझ्या आजपर्यंतच्या कामातील, ते सर्वोत्कृष्ट काम आहे .माझी कलाकृती अशी झाकून ठेवणे हे तुझ्या नोकराला शोभत नाही. मी आत आलो तेव्हा मला खोली वेगळीच भासली.”

“माझ्या नोकराने ते झाकले नाही, बेसिल. मी स्वतः झाकले आहे. चित्रावर फार प्रखर प्रकाश पडत होता.”

“फार प्रखर? नाही. आता प्रकाश अगदी योग्य असा आहे. मला ते बघू दे.” हॉलवर्ड खोलीच्या कोपऱ्यात चालत गेला.

डोरिअन ग्रेच्या ओठातून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली. चित्रकार व झाकलेले चित्र यामध्ये तो धावत गेला. "बेसिल, तू ते बघता कामा नयेस. तू बघू नयेस असे मला वाटते."

"मी माझ्या स्वतःच्या कलाकृतीकडे बघू नको? तू हे मनापासून सांगतो आहेस? पण मी ते का बघायचे नाही?" हॉलवर्ड हसत म्हणाला.

"बेसिल, तू जर ते पहायचा प्रयत्न केलास तर, मी तुझ्याबरोबर कधीच बोलणार नाही. लक्षात ठेव. मी हे गंभीरपणे सांगतो आहे."

हॉलवर्ड आश्चर्याने डोरिअनकडे पाहू लागला. असे त्याने त्याला पूर्वी कधी पाहिले नव्हते. मुलाचा रागीट चेहरा पांढरा फटक पडला होता.

"डोरिअन!"

"काही बोलू नको."

"पण काय झाले? जर तुला तसे वाटत असेल, तर मी ते बघत नाही." तो थंडपणे खिडकीकडे जात बोलला. "येत्या पानगळीच्या मोसमामध्ये पॅरीसमध्ये मी ते प्रदर्शनात ठेवणार असताना, मी माझ्या स्वतःच्या कलाकृतीकडे बघूही नये, हे जरा विचित्रच वाटते."

"प्रदर्शनात ते मांडायचे? तू हे म्हणतो आहेस." डोरिअन ग्रे ओरडला. एक भीतीची लहर त्याच्यातून दौडत गेली. सर्व जग त्याची गुपिते बघणार की काय? त्याच्या आयुष्यातील गूढाकडे लोक टक लाऊन बघणार की काय? ते अशक्य होते.

"हो. जॉर्ज पेटीट, ऑक्टोबर मध्ये माझ्या सर्व उत्तम चित्रांचे प्रदर्शन भरवणार आहे. काळजी करू नकोस. ते फक्त, एक महिन्यासाठी असेल."

डोरिअन ग्रेने स्वतःच्या तोंडापुढे हात धरले. ते गरम व ओलसर होते. त्याला कुठल्यातरी अशुभ संकटाची चाहूल लागल्यासारखे वाटले. "एक महिन्यापूर्वी तर तू म्हणालास की तू ते प्रदर्शित करणार नाहीस म्हणून." तो ओरडला. "तू तुझा विचार का बदललास?" तो अचानक थांबला. त्याच्या डोळ्यात दुष्ट झाक दिसू लागली. त्याला लॉर्ड हेन्री काय म्हणाला होता ते आठवले. तो म्हणाला होता, '"बेसिलला विचार की तो तुझे चित्र का प्रदर्शित करू इच्छित नाही. त्याने मला एकदा सांगितले ती फार विचित्र गोष्ट होती." हो. कदाचित बेसिलचेही काही गुप्त गुपित असेल. त्याला विचारून प्रयत्न करून पहावा.

बेसिलच्या अगदी जवळ येऊन थेट त्याच्या डोळ्यात पहात डोरिअनने विचारले, "बेसिल आपल्या प्रत्येकाच्या काही स्वतःच्या अशा खास गोष्टी असतात. माझे चित्र प्रदर्शित न करण्याबद्दल तुझे काय कारण होते?"

"डोरिअन, जर मी तुला ते सांगितले तर, कदाचित आत्ता मी तुला आवडतो, तितका आवडणार नाही आणि नक्की तू मला हसशील. जर तुला मी तुझे चित्र कधीच पहायला नको असेल, तर मी नाही बघणार. मी नेहमी तुला बघू शकतोच. चित्र प्रदर्शित करण्यापेक्षा, तुझी मैत्री मला जास्त महत्वाची आहे."

"नाही बेसिल, तू मला सांगायला हवेस." डोरिअन म्हणाला. त्याची भीती आता दूर पळाली. आता त्याला फक्त बेसिल हॉलवर्डचे गुपित जाणून घ्यायचे होते.

दुःखी चित्रकाराने म्हटले, "डोरिअन, तुला त्या चित्रात कधी काही विचित्र भासले का?"

"बेसिल!" त्याच्याकडे डोळे विस्फारून बघत मुलगा किंचाळला.

"अच्छा, तू काही पाहिलेस तर! डोरिअन, मी तुला भेटलो, त्या क्षणापासून तुझ्या व्यक्तिमत्वाचा असामान्य ठसा, माझ्यावर उमटला आहे. मी तुला भजतो. तू ज्याच्याबरोबर बोलशील, त्याचा मला हेवा वाटायचा. तू सर्वस्वी माझा असला पाहिजेस, असे मला वाटायचे. तू बरोबर असतानाच फक्त, मी आनंदी असायचो. जेव्हा तू माझ्यापासून दूर जायचास, तेव्हाही माझ्या कलेमध्ये तू असायचास."

"बेसिल — "

"नको. बोलू नकोस. तेव्हा मी जे तुला सांगितले नाही, ते मला तुला आता सांगितलेच पाहिजे. मी तुझे आश्चर्यकारक चित्र काढायचे ठरवले. त्यात, मी माझ्या सर्व भावना तुझ्यासाठी ओतल्या. माझे सर्व ममत्व ओतले. मला वाटते डोरिअन, मी तुला फार सांगितले. मी हेन्रीला हे सांगितल्यावर तो हसला. जेव्हा चित्र पूर्ण झाले व मी एकटा त्याच्यासमोर बसलो, तेव्हा मला समजले की माझे बरोबर होते. — नंतर मला वाटले, कदाचित हा माझा मूर्खपणा आहे आणि जेव्हा ही पॅरीसची मागणी आली — , परंतु आता मला असे दिसते आहे, की ते चित्र प्रदर्शित करणे शक्य नाही."

डोरिअन ग्रेने एक दीर्घ श्वास घेतला. त्याचे गाल आरक्त होऊन, ओठांवर हसू खेळू लागले होते. धोका टळला होता व सध्या तरी तो सुरक्षित होता. बेसिलने किती करुण गोष्ट सांगितली! एखाद्या मित्राच्या व्यक्तिमत्वाच्या इतक्या प्रभावाखाली, तो कधी जाऊ शकला असता का? लॉर्ड हेन्रीमध्ये धोकादायक असा काहीतरी गोडवा होता, पण तेवढाच!"

"हे माझ्यासाठी असामान्य आहे डोरिअन, की तू हे त्या चित्रात पाहिलेस." हॉलवर्ड बोलला.

मुलगा उत्तरला, “मी त्यात काहीतरी पाहिले. फार विचित्र असे काहीतरी.”

“ठीक आहे. आता मी ती गोष्ट पाहिली तर तुला चालेल का?”

डोरिअनने मान हलवली. “बेसिल तेवढे विचारू नकोस, त्या चित्रासमोर, मी तुला उभे राहू देऊ शकत नाही.”

“एक ना एक दिवस तू देशीलच, नाही का?”

“नाही. कधीच नाही.”

“किंवा कदाचित तुझे बरोबर आहे आणि आता मी निघतो, डोरिअन. माझ्या कलेवर खराखुरा परिणाम घडवणारी, माझ्या आयुष्यातील तू एक व्यक्ती आहेस. पण हे सगळे सांगण्यासाठी, मी काय किंमत मोजली आहे हे तुला माहिती नाही.”

“माझ्या प्रिय बेसिल, तू मला काय सांगितलेस? एवढेच की तू मला फार पूजतोस. ही तर स्तुती सुद्धा नाही.”

“त्याचा अर्थ स्तुती असा नव्हताच आणि आता मी तुला हे सांगितल्यामुळे, माझ्यातून माझे काही निसटून गेले आहे. कदाचित तुमचा पूज्य भाव तुम्ही शब्दात मांडू नये, हेच बरे!”

तू पूजनीय वगैरे शब्द वापरू नकोस. ते मूर्खपणाचे आहे. बेसिल, तू आणि मी मित्र आहोत व मित्रच राहू.”

“हे तुझ्यातला हेन्री बोलतो आहे.” चित्रकार दुःखाने बोलला.

“ओहो हेन्री!” तरुण मनुष्य हसला. “हेन्री त्याचे आयुष्य असामान्य गोष्टी बोलण्यात, व करण्यात घालवतो. मला जसे आयुष्य घालवायला आवडेल, तसे तो घालवतो. पण जर मी संकटात सापडलो तर मला नाही वाटत की मी हेन्रीकडे जाईन. मी तुझ्याकडे येणे जास्त पसंत करीन, बेसिल.”

“तू परत माझ्यासाठी मॉडेल म्हणून बसशील?”

“अशक्य! एखाद्या चित्रामध्ये काही भयानक दडलेले असते. त्याला स्वतःचे असे आयुष्य असते. त्यापेक्षा मी तुझ्याबरोबर कपभर चहा घ्यायला येईन”

“ठीक आहे भेटू मग. तू मला चित्र बघायला देत नसल्याने, वाईट वाटते आहे .पण त्याबाबतीत तुझ्या काय भावना असतील ते मी समजू शकतो.”

तो खोलीबाहेर पडल्यावर डोरिअन ग्रे स्वतःशीच हसला. बिचारा बेसिल! खऱ्या कारणासंबंधी त्याला फारच थोडे माहिती आहे. चित्रकाराच्या हेवा वाटणाऱ्या टोकाच्या भावना, त्याला आता अधिक चांगल्या कळल्या व त्याला वाईट वाटले. त्या मैत्रीमध्ये काही दुःखदायक असे, वाईट भावनांनी कलुषित झालेले असे, काहीतरी होते.

त्याने घंटी वाजवून नोकराला बोलावले. त्याला ताबडतोब ते चित्र लपवून ठेवायचे होते. जिथे त्याच्या मित्राना ते सापडू शकणार नाही, अशा ठिकाणी ते ठेवण्याचा त्याचा वेडेपणाच होता.

# प्रकरण ८

## चित्र लपवले



जेव्हा नोकराने प्रवेश केला, तेव्हा डोरिअनने त्याला मिसेस लीफला वाचनालयात पाठवायला सांगितले. मिसेस लीफ, तिच्या कुटुंबाबरोबर इथे खूप वर्षे होती. त्याने तिच्याकडे, जुन्या शाळेच्या खोलीची किल्ली मागितली.

"जुन्या शाळेची खोली, मिस्टर डोरिअन? पण तिथे तर धुळीचे साम्राज्य असेल. मला ती आधी साफ केली पाहिजे." ती ओरडून बोलली.

"मला ती साफ करून नको, मिसेस लीफ. मला फक्त किल्ली हवी आहे."

"ठीक आहे सर. पण तुम्ही तिथे गेलात, तर धुळीने भरून जाल. तुमचे आजोबा वारल्यापासून, गेल्या पाच वर्षात ती उघडलेली नाही."

त्याच्या आजोबांची आठवण केल्यामुळे, त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. त्याच्या सर्व कुटुंबाच्या, त्याच्याकडे वाईट आठवणी होत्या. "त्याचे एवढे काही नाही" तो उत्तरला. "मला ती जागा फक्त बघायची आहे एवढेच. मला किल्ली दे."

"ही घ्या किल्ली, पण तुम्ही तिथे रहाणार नाही ना?" म्हाताऱ्या बाईसाहेब बोलल्या.

"नाही. नाही. आभारी आहे मिसेस लीफ. तुम्ही जाऊ शकता."

एका तासाने चित्र हलवण्यासाठी दोन माणसे आली.

जिना चढताना त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, "सर, हे फार जड आहे."

जुन्या शाळेचे दार उघडताना डोरिअन म्हणाला, "मी दिलगीर आहे. ते जडच आहे." तिथे तो त्याच्या भ्रष्ट आत्म्याची गुपिते, दडवून ठेवणार होता.

तो लहान मुलगा होता, तेव्हापासून तो या खोलीत आलाच नव्हता. त्याला दूर ठेवण्यासाठी ही मोठी खोली त्याच्या आजोबांनी बांधून घेतली होती. आजूबाजूला बघताना, त्याच्या एकाकी बालपणाच्या आठवणी परत दाटून आल्या.

ती खोली भयानक आठवणींनी भरलेली होती. पण ती सुरक्षित होती. किल्ली त्याच्याकडे होती आणि दुसरी व्यक्ती तिथे प्रवेश करू शकत नव्हती. चित्रातला चेहरा म्हातारा व कुरूप होऊ शकत होता. त्याने काय होणार होते? तो कुणालाच दिसणार नव्हता. तो स्वतः सुद्धा बघणार नव्हता. त्याच्या आत्म्याचे भ्रष्ट स्वरूप त्याला बघावे लागणार नव्हते. तो तरुण रहाणार होता. तेवढे बास होते.

जेव्हा ते लोक गेले, तेव्हा डोरिअनने खोलीला कुलूप लाऊन किल्ली त्याच्या खिशात टाकली. आता त्याला सुरक्षित वाटत होते. कोणीही आता ती भयानक गोष्ट, बघणार नव्हते. त्याची लाज फक्त तोच, बघू शकणार होता.

तो परत वाचनालयात गेला. तिथे लॉर्ड हेन्रीची चिठ्ठी मिळाली. त्यात सिबल वेलबद्दल, वर्तमानपत्रात आलेला मजकूर होता. तिचा मृत्यू हा अपघाताने झाला असल्याचे, त्यात अधिकृत रित्या लिहिलेले होते.

त्याने कपाळाला आठ्या घालत त्या कागदाचे दोन तुकडे करून टाकले. मग त्याने खोलीच्या दुसऱ्या टोकाला जाऊन, ते तुकडे भिरकाऊन दिले. किती बेकार होते ते सगळे! आणि किती भयानकपणे, खऱ्या कुरुपतेने, गोष्टी घडवून आणल्या.

कदाचित नोकराने तो मजकूर वाचला असावा, आणि त्याला काहीतरी संशय येण्यास, सुरुवात झाली असावी. पण त्याचे काय मोठेसे? सिबल वेलच्या मृत्यूशी, डोरिअन ग्रेला काय करायचे होते? आता भीती वाटण्याचे, काही कारण नव्हते. डोरिअन ग्रेने तिला मारले नव्हते.

## प्रकरण ९

## मी तुला माझा आत्मा दाखवतो

खूप वर्षे गेली. तरीही बेसिल हॉलवर्डला भुरळ पाडणारे, डोरिअन ग्रेचे आश्चर्यकारक सौदर्य तसेच राहिले. ज्यांनी त्याच्याविरुद्ध भयानक अफवा ऐकल्या होत्या, त्यांचादेखील त्याला भेटल्यावर त्या अफवांवर विश्वास बसत नसे. स्वतःला शुध्द, पवित्र ठेवणारा माणूस जसा दिसेल, तसाच तो नेहमी दिसे.

बऱ्याच लोकाना असा संशय येई, की डोरिअन ग्रेच्या आयुष्यात बरेच काही चुकीचे आहे, पण चित्राबद्दल फक्त त्यालाच माहिती होते. कधी कधी रात्री तो गुपचूप त्या बंद खोलीत जाई. हातात आरसा धरून, तो बेसिल हॉलवर्डने काढलेल्या चित्रापुढे उभा राही. प्रथम तो चित्रातील भयानक म्हाताऱ्या चेहऱ्याकडे पाही व नंतर आरशातील सुंदर, तरुण त्याच्याकडे बघून हसे. तो स्वतःच्या सौदर्याच्या, अधिकाधिक प्रेमात पडत चालला. स्वतःच्या आत्म्याच्या भ्रष्टतेमध्ये, त्याला अधिकाधिक रुची वाटू लागली.

मग असे काही घडले, की ज्यामुळे सर्व बदलून गेले.

त्याच्या अडतिसाव्या वाढदिवसाच्या आदल्या दिवशीची, म्हणजे नऊ नोव्हेबरची गोष्ट आहे. तो लॉर्ड हेन्रीकडून घरी परत येत होता. रात्र धुक्याची व थंडीची होती. ग्रोव्हेसनॉरचा चौक व दक्षिण ऑडले रस्त्याच्या कोपऱ्यावर, धुक्यामध्ये एक मनुष्य त्याच्यासमोरून चालत गेला. तो फार भरभर चालत होता, व त्याच्या कोटाची कॉलर वर केलेली होती. त्याच्या हातात एक पिशवी होती. डोरिअनने त्याला ओळखले. तो बेसिल हॉलवर्ड होता. एका अनामिक भीतीने डोरिअन त्याच्या घराच्या दिशेने भरभर चालू लागला.

पण हॉलवर्डने त्याला पाहिले होते. डोरिअनला, आपल्या मागून तो घाईने येत असल्याची चाहूल लागली. थोड्याच वेळात त्यांची हातमिळवणी झाली.

"डोरिअन, काय असामान्य नशीब आहे. मी तुझ्या वाचनालयात, नऊ वाजल्यापासून थांबलो होतो. मी मध्यरात्रीच्या गाडीने पॅरीसला चाललो आहे व जाण्यापूर्वी तुला भेटायचे होते. मी तुझ्या अंगावरून गेलो तेव्हा मला असे वाटले की तो तूच आहेस किंवा निदान कोट तरी तुझा आहे. पण मला खात्री नव्हती. तू मला ओळखले नाहीस काय?"

"माझ्या प्रिय बेसिल, या धुक्यात मला ग्रोव्हेसनॉरचा चौकसुद्धा ओळखू येत नव्हता. माझे घर इथे कुठे तरी असल्यासारखे मला वाटत होते, पण मला त्याची खात्री नव्हती. मी तुला

कैक वर्षात भेटलो नाही, आणि तू तर लांब चालला आहेस. याबद्दल मला वाईट वाटते. पण मला वाटते, की तू लवकरच परतशील."

"नाही. मी सहा महिने आता इंग्लंडबाहेर आहे. हे तुझे घर आले. एक क्षणभर मला आत येऊ दे. मला तुला काही सांगायचे आहे."

"हे छान आहे. पण तुझी गाडी चुकणार नाही ना?" डोरिअन ग्रे म्हणाला व वर जाऊन त्याने किल्लीने दार उघडले.

"मला भरपूर वेळ आहे." तो बोलला. "आत्ता फक्त अकरा वाजत आहेत आणि सव्वा बाराशिवाय गाडी हलणार नाही. माझ्याकडे फक्त एवढी पिशवी आहे. मी वीस मिनिटात, व्हिक्टोरिया स्टेशनला पोचू शकतो."

डोरिअन त्याच्याकडे बघून हसला. "आत ये. नाहीतर धुके माझ्या घरात शिरेल."

डोरिअनच्या पाठोपाठ हॉलवर्ड वाचनालयात आला. तेथे खोलीच्या एका बाजूला, दोन दिवे होते व दुसऱ्या बाजूला धगधगत्या लाकडांची शेकोटी होती.

"तुला पेय घ्यायला आवडेल का?" डोरिअनने विचारले.

"नको आभारी आहे. मला अजून काहीही नको." त्याची कोट व टोपी काढत चित्रकार बोलला. "आणि आता माझ्या प्रिय डोरिअन, मला तुझ्याशी गंभीरपणे बोलायचे आहे. तू ते माझ्यासाठी, फार कठिण करून ठेवले आहेस."

"ते कशाबद्दल आहे?" स्वतःला सोफ्यावर झोकून देत डोरिअन ओरडला. "मला अशी आशा आहे की ते माझ्याबद्दल नसावे. आज माझ्याबद्दल बोलायला मी दमलो आहे. तू दुसऱ्या कुणाबद्दल बोललास तर जास्त बरे."

हॉलवर्ड त्याच्या खोल आवाजात म्हणाला, "ते तुझ्याबद्दलच आहे आणि मला तुला ते सांगितलेच पाहिजे."

"मला माझ्याबद्दल कहीही ऐकायचे नाही. मला दुसऱ्या लोकांच्या भानगडी ऐकायला आवडतात. स्वतःच्या भानगडी ऐकण्यात मला काहीही रस नाही."

"डोरिअन, प्रत्येक सभ्य गृहस्थाला स्वतःचे चांगले नाव असलेले आवडते. लोकांनी तुला भयानक व भ्रष्ट म्हणावे, हे तुला नक्कीच आवडणार नाही. पण माझा या अफवांवर विश्वास

नाही. आता तुला पाहिल्यावर तरी, माझा त्यावर विश्वास बसणे शक्य नाही. भ्रष्टता ही अशी गोष्ट आहे, की ती माणसाच्या चेहऱ्यावर दिसल्याशिवाय रहात नाही. ती लपवता येत नाही.'

'माझ्या प्रिय बेसिल, — "

"आणि जरी मी तुला हल्ली वारंवार भेटत नाही, तू माझ्या घरी कधीच येत नाहीस, तरी लोकांकडून जेव्हा मी भयानक गोष्टींची कुजबुज ऐकतो, तेव्हा काय बोलायचे ते मला कळत नाही. तुझ्या इतर मित्रांनी स्वतःला ठार का केले? चांगल्या कुटुंबातील ॲड्रीयन सिंगलटनसारखी तरुण मंडळी, आणि तो गरीब तरुण सैनिक?"

"थांब बेसिल. तुला माहिती नसलेल्या गोष्टींबद्दल, तू बोलत आहेस. लोक इंग्लंडमध्ये कसे बोलतात मला माहिती आहे. दोन चेहरे असलेल्या लोकांचा हा देश आहे. माझ्यासारख्याबद्दल ते अफवा उठवून कुजबुज करतात आणि नंतर दुसरे बघत नाही आहेत, असे बघून त्याहून वाईट गोष्टी करतात."

हॉलवर्ड किंचाळून बोलला, "डोरिअन, तो प्रश्न नाही. मला माहिती आहे इंग्लंड वाईट आहे. पण तेच कारण आहे. तुझ्या मित्रांवर तुझा चांगला प्रभाव पडावा, असे मला वाटते. त्याऐवजी तू चांगुलपणा व प्रामाणिकपणा, यावरचा विश्वास गमावून बसला आहेस. सुखलोलुपतेचे वेड, तू त्या गरीब बिचाऱ्या तरुण लोकांमध्ये भरवले आहेस."

डोरिअन हसला.

"तू असा, कसा काय हसू शकतोस? मला फक्त तुझे नाव, बद्‌दू व्हायला नको आहे. तू आश्चर्यकारक रित्या, प्रभावी आहेस. तो प्रभाव चांगला असू दे. अजून मला कळत नाही, की मी तुला ओळखतो की नाही? त्यासाठी मला, तुझे अंतर्मन जाणून घ्यायची गरज आहे."

"माझे मन, आत्मा जाणून घायचा आहे? डोरिअन किंचाळला, त्याने सोफ्यावरून उडी मारली. तो भीतीने जवळजवळ पांढरा फटक पडला होता.

हॉलवर्ड उत्तरला, "हो. मला तुझ्या आत्म्यात डोकावायचे आहे, पण फक्त देवच हे करू शकतो." त्याच्या आवाजात पूर्ण विषाद भरला होता.

तरुण माणसाचे ओठ कटु हसले. आज रात्री तू स्वतः ते बघशील." टेबलावरचा दिवा उचलत तो म्हणाला, "ये. हे तुझे स्वतःचेच काम आहे, तर तू ते का बघू नयेस? सर्व जगाला त्याबद्दल सांगायचे की नाही, हे तू नंतर ठरवू शकतोस. कोणीच तुझ्यावर विश्वास ठेवणार नाही.

उलट त्यामुळे मी लोकांना, जास्त आवडू लागेन. ये. मी सांगतो, तू भ्रष्टतेबद्दल फार बोललास. आता ती प्रत्यक्ष समोर बघ."

त्याच्या प्रत्येक शब्दात, वेडेपणा भरलेला होता. त्याचे गुपित कोणीतरी जाणून घेणार आहे, याचा त्याला आसुरी आनंद होत होता. ते चित्र काढणारा चित्रकार, त्या गुपितामध्ये सहभागी होणार होता. त्या चित्रकाराचे उर्वरित आयुष्य, त्याच्या कृत्याच्या आठवणीमुळे दुःखमय होणार होते.

त्याने बोलणे पुढे सुरु ठेवले, "हो. मी तुला माझा आत्मा दाखवणार आहे. फक्त देवच जे बघू शकतो असे तुला वाटते, ते तू स्वतःच बघशील."

हॉलवर्डने पाऊल मागे घेतले.

तो किंचाळला, "तू असे म्हणू शकत नाहीस, डोरिअन. ते मूर्ख आहेत. त्यांच्या बोलण्याला काही अर्थ नाही."

"तुला असे वाटते?" तो परत हसला.

"मला ते माहिती आहे, डोरिअन. पण तू मला ते सांगितले पाहिजेस."

"मला हात लाऊ नकोस. तुला काय म्हणायचे आहे ते पूर्ण कर."

चित्रकाराला मनस्वी उदास वाटले. तो शेकोटीजवळ जाऊन उभा राहिला.

"मी वाट बघतो आहे, बेसिल." तरुण मनुष्य कडक, स्पष्ट आवाजात म्हणाला.

तो गरकन वळला. "मला असे म्हणायचे आहे की तुझ्याविरुद्ध लोक ज्या वाईटसाईट भयानक गोष्टी सांगत आहेत, त्याबद्दल तुझ्याकडे काय उत्तर आहे? डोरिअन, त्या गोष्टी खऱ्या नाही आहेत, हे मला सांग. मी कशा अवस्थेतून जातो आहे हे तुला कळत नाही का? अरे देवा! तू वाईट, भ्रष्ट व लाजिरवाणा आहेस, असे मला सांगू नकोस." तो ओरडून बोलला.

डोरिअन ग्रे शांतपणे हसत बोलला, "बेसिल वरती ये. मी माझी प्रत्येक दिवसाची रोजनिशी ठेवतो. तू माझ्याबरोबर वर आलास तर मी ती तुला दाखवतो."

"डोरिअन, मी तुझ्याबरोबर येतो. जर तुझी तशी इच्छा असेल, तर मी येतो. माझी गाडी आता चुकणारच आहे. पण त्याचे विशेष काही नाही. मी उद्या जाऊ शकतो. पण आज रात्री तू मला, काही वाचायला लाऊ नकोस. मला फक्त माझ्या प्रश्नाचे साधे उत्तर हवे आहे."

"ते मी तुला वरती देतो. ते मी तुला इथे देऊ शकत नाही. तुला फार वेळ थांबावे लागणार नाही."

# प्रकरण १०

## बेसिल चित्र बघतो



तो खोलीतून बाहेर पडून जिना चढू लागला. त्याच्या जवळून, मागून, बेसिल जाऊ लागला. रात्री लोक जसे सावकाश चालतात, तसे ते शांतपणे चढले. भिंतीवर व जिन्यावर दिव्यामुळे विचित्र सावल्या पडत होत्या.

जेव्हा ते वर पोचले, तेव्हा डोरिअनने दिवा जमिनीवर ठेवला व खिशातली किल्ली काढून कुलूप उघडले.

“तुला खरंच जाणून घ्यायचे आहे का, बेसिल?” त्याने खालच्या आवाजात विचारले.

“हो.”

“मला आनंद होतो आहे.” तो हसत पुढे म्हणाला, “माझ्याबद्दल प्रत्येक गोष्ट माहिती पाहिजे, असे  वाटणारा तू एकमेव माणूस आहेस. तुला वाटते त्यापेक्षा, माझ्या आयुष्यावर तुझा

प्रभाव फार आहे."  दिवा उचलून त्याने दार उघडले व आत शिरला. त्यांच्यामधून गार वारा वहात गेला. "तुझ्यामागे दार लाऊन घे." टेबलावर दिवा ठेवत तो कुजबुजला.

हॉलवर्डने डोळे विस्फारून, खोलीत इतस्ततः पाहिले. कैक वर्षे तिथे कोणी राहिलेले नव्हते. सर्वत्र धुळीचे साम्राज्य होते. गालीच्याला भोके पडली होती. एक उंदीर जमिनीवरून आडवा गेला.

"तर मग काय म्हणतोस बेसिल, आत्म्याचे दर्शन फक्त देवालाच होऊ शकते. तू चित्राचा पडदा बाजूला केलास, तर तुला माझा आत्मा दिसू शकेल."

हे बोलणारा आवाज दुष्ट व थंड होता.

कपाळाला आठ्या घालत, हॉलवर्ड म्हणाला, "तू मूर्ख आहेस, डोरिअन."

"तू तो पडदा बाजूला करत नाहीस का?" जुना जांभळा पडदा जमिनीवर फेकत, तो तरुण मनुष्य म्हणाला, "मग मी स्वतःच करतो."

चित्रातला चेहरा बघताच, चित्रकाराच्या तोंडातून भीतीने किंकाळी बाहेर पडली. तो बघत होता तो डोरिअन ग्रेचाच चेहरा होता व त्यात अजूनही थोडी आश्चर्यकारक सुंदरता होती. पण त्यावर वार्धक्याच्या व भ्रष्टतेच्या, भयानक खुणा दिसत होत्या. पण हे कोणी केले? त्याने दिवा चित्रावर उंच धरला. डाव्या बाजूच्या कोपऱ्यात त्याचे नाव लाल रंगाने लिहिलेले होते.

काय घडले होते? त्याने कधीच हे केले नव्हते. पण तरीही ते त्याचेच चित्र होते. ते त्याच्या ओळखीचे होते आणि त्यामुळे त्याचे रक्त गोठल्यासारखे झाले. त्याने स्वतःने काढलेले चित्र! याचा अर्थ काय होता? ते का बदलले होते? त्याने वळून आजारलेल्या डोळ्यांनी डोरिअन ग्रेकडे बघितले. तरूण मनुष्य भिंतीजवळ उभे राहून त्याचे निरीक्षण करत होता. त्याने त्याच्या कोटातून फूल बाहेर काढले होते व तो त्याचा वास घेत होता.

शेवटी हॉलवर्ड ओरडला, "याचा अर्थ काय? " त्याला स्वतःचा तारस्वर विचित्र वाटला.

"खूप वर्षांपूर्वी जेव्हा मी एक मुलगा होतो, तेव्हा तू मला भेटलास व माझी स्तुती केलीस." डोरिअन ग्रे फुलावर हात ठेऊन म्हणाला. "तू मला माझ्या सौंदर्यावर प्रेम करायला शिकवलेस. एक दिवस तू तुझ्या मित्राशी माझी ओळख करून दिलीस. आपण तरुण असणे किती छान असते, ते त्याने मला समजाऊन सांगितले .तू ते चित्र पूर्ण केलेस आणि मला दाखवून दिलेस की सुंदर असणे, किती छान असते. एका वेड्या क्षणी मी एक इच्छा केली — "

"मला आठवते आहे. किती जसेच्या तसे मला आठवते आहे. नाही. हे अशक्य आहे या रंगांमध्ये काहीतरी गडबड असणार. मी तुला सांगतो, हे अशक्य आहे."

खिडकीकडे जात तरुण मनुष्य बोलला, "खरेच, काही अशक्य असते?"

"तू मला सांगितलेस, की तू ते खराब केलेस." इति चित्रकार.

"मी चुकीचे सांगितले. त्यानेच मला खलास केले." मुलगा बोलला.

"माझा विश्वास बसत नाही, की हे माझे चित्र आहे. त्यात वाईट, लाजिरवाणे असे काहीच नव्हते. तू माझ्या दृष्टीने बरोबर, योग्य असाच होतास आणि हा तर, नरकातील चेहरा आहे."

"हा माझ्या आत्म्याचा चेहरा आहे. बेसिल, आपल्या प्रत्येकामध्ये स्वर्ग आणि नरक असतो." डोरिअन रानटीपणे ओरडून म्हणाला.

हॉलवर्डने पुन्हा वळून, चित्राकडे निरखून बघितले. "अरे देवा! हे खरे आहे का? तू तुझ्या आयुष्याशी, असा खेळ खेळला आहेस? लोक बोलतात त्याहीपेक्षा तू वाईट असला पाहिजेस." तो ओरडला.

हॉलवर्डने स्वतःला टेबलाशेजारील खुर्चीत झोकून दिले व चेहरा हाताच्या ओंजळीत लपवला. दिवा जमिनीवर पडून विझला.

"देवा रे! डोरिअन, काय भयानक धडा! काय भयंकर घडले हे!" त्याला उत्तर मिळाले नाही .पण खिडकीजवळ तरुण मनुष्याचे हुंदके त्याने ऐकले. "आपण देवाजवळ क्षमायाचना केली पाहिजे. मी तुझी फार भलावण केली. त्याबद्दल मी शिक्षेस पात्र आहे. तू स्वतःच्या सौदर्यात फार गुंतून पडलास. दोघानाही शिक्षा झाली. चांगला धडा मिळाला."

डोरिअन ग्रे हळूहळू वळला व चित्रकाराकडे पाहिले. त्याच्या डोळ्यात अश्रू होते. तो म्हणाला, "फार उशीर झाला आहे, बेसिल."

"पण ती भयंकर गोष्ट, आपल्याकडे डोळे रोखून बघते आहे, असे नाही तुला वाटत?"

डोरिअन ग्रेने चित्राकडे बघितले. अचानक त्याला जाणवले, की आपण बेसिल हॉलवर्डचा द्वेष करत आहोत. त्याच्या आयुष्यात त्याने कोणाचाही केला नसेल, इतका त्या टेबलाशी बसलेल्या माणसाचा, त्याला तिरस्कार वाटू लागला.

त्याने खुनशीपणे इकडेतिकडे पाहिले. त्याच्याकडे तोंड करून असलेल्या रंगवलेल्या कपाटावर, काहीतरी चकाकले .त्याने काही दिवसापूर्वी तिथे ठेवलेला तो चाकू होता. हॉलवर्डला ओलांडून तो हळूहळू तिथपर्यंत गेला. चाकू हातात घेतला व तो वळला. हॉलवर्ड त्याच्या खुर्चीत हलला. बेसिल हॉलवर्डकडे डोरिअन धावला व पुन्हापुन्हा चाकू त्याच्या मानेत खुपसत राहिला. मग त्याने चाकू टेबलावर फेकून दिला व मागे उभा राहिला. गालिच्यावर पडणाऱ्या रक्ताशिवाय त्याला काही दिसत नव्हते. दार उघडून तो जिन्यावर गेला. घर पूर्ण शांत होते. तिथे कुणीही नव्हते.

काय झटपट सगळे आटपले! स्मशानशांततेच्या आभासात, तो खिडकीकडे चालत गेला व ती उघडली. वाऱ्याने धुके पळवून लावले होते. आकाश निरभ्र होते. त्याने खाली पाहिले. त्याला एक पोलीस रस्त्यातून चालताना दिसला. तो रस्त्यावरचे सगळे दिवे लावत चालला होता.

खिडकी लाऊन घेत, तो परत खोलीत गेला. त्याने खून झालेल्या इसमाकडे, बघितले नाही. त्याला असे वाटले की या गोष्टीबद्दल काही विचार केला नाही, तर ते गुपितच राहील. ज्याने ते भयानक चित्र काढले, तो मित्र आता जिवंत नव्हता. हे पुरेसे होते. त्याने दिवा उचलला व त्याच्यामागे खोलीचे दार लाऊन घेत बाहेर पडला. जिन्यातून उतरताना त्याला वेदनेने कण्हण्याचा आवाज ऐकल्यासारखे वाटले. तो बराच वेळ थांबला. चाहूल घेतली. नाही. सगळे स्तब्ध होते.

जेव्हा तो वाचनालयात पोचला, तेव्हा त्याने कोपऱ्यात बॅग व कोट बघितला. ते कुठेतरी लपवणे, क्रमप्राप्त होते. त्याने एक गुप्त कपाट उघडले व त्यात ते कोंबले. ते त्याला नंतर, सहज जाळून टाकता आले असते. मग त्याने त्याचे घड्याळ, बाहेर काढले. दोनला वीस मिनिटे होती.

तो बसून विचार करू लागला. बेसिल हॉलवर्ड इथून अकरा वाजता बाहेर पडला. कोणीच त्याला परत येताना, पाहिले नाही. नोकर बिछान्यात होते. — पॅरीस — हो. बेसिल पॅरीसलाच गेला होता. त्याने ठरवल्याप्रमाणे मध्यरात्रीच्या गाडीने. कुणाला काही संशय येईपर्यंत, अनेक महिने जातील. महिने — त्याच्या खूप आधीच, तो सर्व काही नष्ट करून टाकू शकेल.

अचानक त्याला एक विचार सुचला. त्याने त्याची कोट टोपी घातली व तो पुढील खोलीत गेला. खिडकीतून त्याला, पोलीस त्याच्या घरावरून जाताना दिसला. तो थांबला. त्याने श्वास रोधून धरला. थोड्या वेळाने तो घराबाहेर पडला. व त्याच्यामागे दार हळूच लाऊन घेतले.

मग त्याने घंटी वाजवायला सुरवात केली. पाच मिनिटात एक नोकर आला. तो अर्धवट कपड्यात होता व झोपेतून उठलेला वाटत होता.

"दिलगीर आहे, फ्रान्सिस, मला तुला उठवावे लागले. पण माझी किल्ली मी विसरलो. किती वाजले?" आत येत तो म्हणाला.

"सर, दोन वाजून दहा मिनिटे." घड्याळात बघत तो मनुष्य म्हणाला.

"दोन वाजून दहा मिनिटे? काय हा उशीर! तू मला उद्या नऊ वाजता उठव. मला थोडे काम आहे."

"ठीक आहे, सर."

"संध्याकाळी कुणी फोन केला होता का?"

"मिस्टर हॉलवर्ड, सर. ते इथे अकरा पर्यंत होते. आणि मग ते गाडी पकडायला निघून गेले."

"अरेरे! मी त्याना भेटलो नाही. त्यांनी काही निरोप ठेवला का?"


"नाही, सर. ते म्हणाले की पॅरीसहून ते तुम्हाला लिहितील."

"एवढेच ना? ठीक आहे. मला उद्या नऊ वाजता उठवायला विसरू नकोस."

"नाही, सर."

फ्रान्सिस झोपायला त्याच्या खोलीकडे गेला.

डोरिअन ग्रेने, त्याची कोट टोपी टेबलावर भिरकावली व वाचनालयात गेला. पाऊण तास तो तिथे, येरझऱ्या घालत होता. ओठ चाऊन चावून, विचार करत होता. नंतर त्याने कपाटातून, एक पुस्तक काढले व पाने चाळू लागला. 'अॅलन कँपबेल, १५२, हार्टफोर्ड रस्ता, मेफेअर' "हो. हाच मनुष्य मला हवा होता."



# प्रकरण ११

## शवाची समस्या



दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता, त्याचा नोकर कपभर चॉकलेट घेऊन आला व त्याने पडदे उघडले.

त्याचा एक हात गालाखाली घेऊन, डोरिअन शांतपणे झोपला होता. डोळे उघडताच त्याच्या ओठांवर

स्मितहास्य झळकले. तो वळला व उठून त्याचे चॉकलेट पेय पिऊ लागला. आकाश प्रकाशमान होते. नोव्हेंबरचा सूर्य खोलीत आला. ती खूपशी, मे महिन्यातील सकाळ वाटत होती.

आदल्या रात्री कायकाय झाले, ते त्याला हळूहळू आठवले. मृत मनुष्य आता दिवसा उजेडी, अजून तिथे बसलेला होता. किती भयानक होते ते! अशा भयानक गोष्टी, रात्री ठीक आहेत. दिवसा नाही.

त्याचे चॉकलेट पिऊन झाल्यावर, तो टेबलापाशी गेला व त्याने दोन पत्रे लिहिली. एक त्याने खिशात ठेवले व दुसरे नोकराकडे दिले.

“फ्रान्सिस, हे पत्र, १५२, हर्टफोर्ड रस्ता, मेफेअर’; येथे देऊन ये. जर मिस्टर कँपबेल गावाला गेले असतील तर त्यांचा तेथील पत्ता घेऊन ये.”

नोकर गेल्यावर त्याने सिगरेट पेटवली व एका कागदावर चित्र काढायला सुरवात केली. पहिल्यांदा त्याने फुले काढली, मग घरे, मग माणसांचे चेहेरे काढले. अचानक त्याला जाणवले की त्याने काढलेला प्रत्येक चेहरा बेसिल हॉलवर्डसारखा दिसतो आहे. तो वैतागला व सोफ्यावर लोळायला गेला.

एक तास फार सावकाश गेला. दर सेकंदाला, तो घड्याळाकडे बघत होता. जसजशी मिनिटे जाऊ लागली, तसतसा तो अत्यंत हवालदिल होऊ लागला. तो उठून खोलीत येरझऱ्या घालू लागला. त्याचे तळवे गार पडले. शेवटी दार उघडून नोकर आत आला.

“मिस्टर कँपबेल, सर.” तो म्हणाला.

“फ्रान्सिस, त्याला ताबडतोब आत यायला सांग.“ तो पुन्हा स्वतःत आला. भीती दूर पळाली.

थोड्याच क्षणात ॲलन कँपबेल आत आला. तो फार रागावलेला दिसत होता. काळजीत पडलेला, वाटत होता.

“ॲलन, चांगले केलेस. तू आलास, त्याबद्दल मी तुझा आभारी आहे.”

मी पुन्हा तुझ्या घरात पाऊल ठेवीन, असे मला वाटले नव्हते, ग्रे. पण तू म्हणालास, हा जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्याने त्याचे हात, कोटाच्या खिशात ठेवले होते. त्याचा आवाज, थंड व जरबेचा होता.

“हो. हा जीवनमरणाचा प्रश्न आहे. आणि एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या, बस”

कँपबेलने टेबलाच्या कडेची खुर्ची घेतली. डोरिअन त्याच्या समोर बसला. दोन माणसांचे डोळे भिडले. डोरिअनच्या डोळ्यात विषादाची छटा होती. तो काय करायला निघाला आहे, ते भयानक आहे, हे त्याला माहिती होते.

क्षणभराने डोरिअन शांतपणे बोलला, “या घराच्या वरच्या मजल्यावरील कुलुपबंद खोलीत एक मृत मनुष्य टेबलाच्या कडेला बसलेला आहे. त्याला मरून आता दहा तास झाले आहेत. माझ्याकडे असा रोखून बघू नकोस. तो कोण मनुष्य आहे, हे तुला कळायची काही

गरज नाही. तो कसा व का मेला, ह्याचीही तुला काही गरज नाही. तुला जे करायचे आहे, ते असे — "

"थांब ग्रे, मला काहीही ऐकून घ्यायचे नाही. तू मला सांगतो आहेस ते खरे की खोटे, याची मला पर्वा नाही. तुझ्या आयुष्यात, मला काहीही करायचे नाही. तुझी भयानक गुपिते, तुझ्याजवळच ठेव. आता मला त्यात काही रुची नाही."

"ॲलन, तुला त्यात रुची घ्यावीच लागेल. ॲलन, त्याबद्दल मी दिलगीर आहे. माझा नाईलाज आहे. मला वाचवू शकेल, असा तूच एकमेव माणूस आहेस. ॲलन, तू शास्त्रज्ञ आहेस. तुला रसायनशास्त्राची व तदनुषंगिक गोष्टींची, माहिती आहे. तुला एवढेच करायचे आहे, की वर जे काही पडले आहे, ते नष्ट करून टाकायचे."

"डोरिअन, तुला वेड लागले आहे. मी असले काहीही, करणार नाही आहे."

"त्याने स्वतःला मारून घेतले, ॲलन."

'त्याचा मला आनंद आहे, पण त्याला ते कोणी करायला लावले? तूच. असे मला वाटते."

"अजूनही तू माझ्यासाठी, हे करायला तयार नाहीस?"

"अर्थातच नाही. तू चुकीच्या माणसाकडे आला आहेस. तुझ्या इतर मित्रांकडे जा. माझ्याकडे नको."

"ॲलन, तो खून होता. मी त्याला ठार केले. त्याने मला काय भोगायला लावले, ते तुला माहिती नाही."

"खून? अरे बापरे! डोरिअन, तू शेवटी ही हद्द गाठलीस. मी यात काही करणार नाही."

"तुला काहीतरी करावेच लागेल. आता अधिक प्रश्न विचारू नकोस. मी तुला आधीच, खूप जास्त सांगितले आहे .पण तू हे करच, ॲलन. आपण एके काळी मित्र होतो.'

"डोरिअन, त्या दिवसांबद्दल, काही बोलू नकोस. ते आता, काळाआड गेले."

"ॲलन, ते याबद्दल मला फाशी देतील. तुला समजत नाही का? मी जे कृत्य केले आहे, त्याबद्दल ते मला ठार करतील."

कँपबेल जायला उठला. "मला याच्याशी काही कर्तव्य नाही."

“तू नकार देतोस?”

“हो.”

तीच उदास छटा डोरिअनच्या डोळ्यात उमटली. मग त्याने एक कागदाचे चिटोरे घेऊन, त्यावर काहीतरी लिहिले. त्याने ते वाचून टेबलावरून पलिकडे सरकवले. मग तो उठून खिडकीजवळ गेला.

कँपबेलने त्याच्याकडे आश्चर्याने पाहून चिटोरे उचलले. ते वाचताना तो पांढरा फटक पडला आणि तो खुर्चीत मागे कोसळला. दोनतीन मिनिटांनी डोरिअन मूकपणे आत आला व त्याच्यासमोर उभा राहिला.

“मला तुझ्याबद्दल वाईट वाटते, ॲलन.” त्याचा हात ॲलनच्या खांद्यावर ठेऊन तो म्हणाला. ”पण दुसरा मार्गच नाही. माझ्याकडे आधीच लिहिलेले पत्र आहे. हे बघ. तू हा पत्ता बघ. जर तू मला मदत केली नाहीस तर, मी ते पाठवून देईन. मग काय होईल, ते तुला माहिती आहे. आता तू मला मदत करणार आहेस. आता नकार देणे, तुला अवघड आहे.”

कँपबेलने चेहरा हातात झाकून घेतला.

“गोष्ट अगदी साधी आहे, ॲलन. हे करायलाच हवे. या प्रसंगाला तोंड दे व काय ते कर.”

कँपबेलच्या तोंडून भयाण आवाज आला.

“चल ॲलन, आता लवकर काय ते ठरवायला हवे.

ॲलन क्षणभर थांबला व बोलला, “वरच्या खोलीत शेकोटी आहे का?”

“हो. तिथे गॅस शेकोटी आहे.”

“मला घरी जाऊन आणल्या पाहिजेत — काही गोष्टी.”

“नाही. ॲलन, तू घर सोडता कामा नयेस. तुला काय हवे आहे, ते लिहून काढ आणि माझा नोकर तुला त्या वस्तु आणून देईल.” जेव्हा कँपबेलने सांगितलेल्या वस्तु त्यात घातलेली प्रचंड लाकडी पेटी घेऊन, नोकर परतला, तेव्हा जवळजवळ दोन वाजले होते.

“फ्रान्सिस, आता उरलेला दिवस तू गेलास तरी चालेल.”

“आभारी आहे, सर.”

जेव्हा नोकर निघून गेला, तेव्हा दोघांनी मिळून, ती पेटी जिन्यातून वर नेली. डोरिअनने किल्ली काढून, कुलुपाला लावली. मग तो थांबला. कँपबेलने पाहिले, की त्याचे डोळे अश्रुंनी डबडबले होते. ”मला नाही वाटत अॅलन, मी आत जाऊ शकेन.” तो म्हणाला.

“मला तुझी गरज नाही.” कँपबेल कोरडेपणे म्हणाला.

डोरिअनने दार अर्धवट उघडले, त्याबरोबर चित्रातील चेहरा, उन्हात त्याच्याकडे रोखून बघताना दिसला. आदल्या रात्री तो ते चित्र झाकून ठेवायला विसरला होता, ते त्याला आठवले. तो झटकन पुढे होणार होता, तेवढ्यात त्याला असे काही दिसले की त्याने एकदम मागेच उडी मारली.

चित्रातील एका हातावर रक्त होते. काय भयानक होते ते!

मृत माणसाकडे न बघायचा प्रयत्न करत, तो घाईने खोलीत घुसला. जमिनीवरून पडदा उचलून त्याने तो चित्रावर फेकला. मग खोलीतून झटकन बाहेर पडून तो जिना उतरून खाली आला.


सात वाजून गेल्यावर खूप वेळाने, कँपबेल परत वाचनालयात आला. त्याचा चेहरा पांढरा फटक पडलेला होता, पण तो एकदम शांत होता. तो म्हणाला, “तू मला जे सांगितले होतेस, ते मी केले. आणि आता मी जातो. परत कधी एकमेकाना भेटायला नको.”

डोरिअन साधेपणाने बोलला, “अॅलन, तू मला वाचवले आहेस हे, मी विसरू शकणार माही.”

कँपबेल गेल्यावर, तो वरती गेला. खोलीत भयानक वास येत होता, पण टेबलाच्या बाजूला बसलेले धूड गेले होते.

# प्रकरण १२

## तू इतका तरुण का दिसतोस



"तू आता चांगला वागणार आहेस असलं काही मला सांगू नकोस." लॉर्ड हेन्री ओरडून म्हणाला. "तू अगदी चांगलाच आहेस. बदलू नकोस."

डोरिअन ग्रे मान हलवत म्हणाला, "नाही हेन्री, मी माझ्या आयुष्यात, खूप भयंकर गोष्टी केल्या आहेत.. आता अजून मी काही करणार नाही. पण मला सांग, इकडे इंग्लंडमध्ये सध्या काय चालले आहे? मी एक महिन्यापेक्षा जास्त काळ बाहेरच आहे."

"बेसिलच्या गायब होण्याबद्दल लोक अजून चर्चा करत आहेत."

"त्याना अजून त्याचा कंटाळा आला नाही का?" कपाळावर आठ्या घालून मद्य ओतत, डोरिअन म्हणाला.

"माझ्या प्रिय मुला, ते चर्चा करत आहेत, त्याला फक्त सहा आठवडेच तर झाले आहेत. ब्रिटीश लोकाना दर तीन महिन्यांनी संभाषणासाठी, एक विषय लागतो. तरी अलीकडे,

ते खरे नशीबवान ठरले आहेत. पहिल्यांदा माझी बायको मला सोडून गेली, ते प्रकरण होते. नंतर ॲलन कँपबेलने स्वतःला मारून घेतले. आणि आता या कलाकाराचे, गूढ रित्या बेपत्ता होणे. नऊ नोव्हेंबरला, मध्यरात्रीची गाडी बेसिलने पकडली, असे ब्रिटीश पोलीस म्हणतात. पण फ्रेंच पोलिसाना खात्री आहे, की तो पॅरीसला पोचलाच नाही."

उजेडात आपले मद्य धरत डोरिअनने विचारले, "बेसिलचे काय झाले असेल, असे तुला वाटते?

"मला काही कल्पना नाही.  जर बेसिलला स्वतःला लपूनछपून रहायचे असेल, तर त्याच्याशी मला काही कर्तव्य नाही. जर तो मेला असेल, तर मला त्याबद्दल विचारच करायचा नाही. मृत्यू ही एकच अशी गोष्ट आहे, की जी नेहमी मला घाबरवते. मला मृत्यूचा तिरस्कार वाटतो."

"का?" दबलेल्या आवाजात तरुण मनुष्य बोलला.

लॉर्ड हेन्री म्हणाला, "कारण, घडणारी अंतिम अशी, ती एकच गोष्ट आहे. डोरिअन, आपण संगीताच्या खोलीत कॉफी घेऊ. चल. तू माझ्यासाठी चॉपिन वाजवायला हवेस. माझ्या बायकोबरोबर पळून जाणारा माणूस, चॉपिन फार सुंदर वाजवायचा. बिचारी व्हिक्टोरिया! मला ती फार आवडायची. तिच्याशिवाय घर एकदम सुने झाले आहे."

डोरिअन काही बोलला नाही, पण पुढील खोलीत जाऊन पियानोवर बसला. कॉफी आल्यावर त्याने वाजवणे बंद केले. लॉर्ड हेन्रीकडे बघत तो म्हणाला, "हेन्री, बेसिलचा खून झाला असे तुला वाटते का?'

लॉर्ड हेन्रीने जांभई दिली. "प्रत्येकाला बेसिल आवडायचा. कोणाला त्याचा खून करावासा का वाटेल? शत्रू असण्याइतका काही तो हुशार नव्हता. अर्थात तो उत्कृष्ट चित्रकार होता, पण चित्र काढणारा माणूससुद्धा कंटाळवाणा असू शकतो. बेसिल खरंच, जरा वैताग माणूसच होता. तो तुला मात्र, अगदी भजायचा. त्याची एवढी एकच गोष्ट, मला रस वाटेल अशी होती."

डोरिअन विषादाने बोलला, "मला बेसिलचा फार लळा होता. पण त्याचा खून झाला, असे लोक म्हणत नाहीत?"

काही वर्तमानपत्रात तसे आले होते. पण त्यात काही तथ्य आहे, असे मला वाटत नाही. मला माहिती आहे की पॅरीसमध्ये काही भीतीदायक स्थळे आहेत. पण तिथे जाईल अशा प्रकारचा, बेसिल हा मनुष्य नव्हता."

"मी बेसिलचा खून केला असे मी म्हटले, तर तू काय म्हणशील, हेन्री?" तरूण माणसाने विचारले. हे बोलल्यावर त्याने त्याचे काळजीपूर्वक निरीक्षण केले.

"नाही डोरिअन, तू कुणाला मारणार नाहीस. सामान्य लोक खून करतात. आपण जो असामान्य कलानंद घेतो, तो मिळवण्याचा त्यांचा तो मार्ग असतो. असले काही मला सांगू नकोस."

'असामान्य आनंद शोधण्याचा एक मार्ग! एकदा खून करणारा माणूस, परत खून करू शकेल असे तुला वाटते का?"

"ओहो! कुठलीही गोष्ट आपण सतत केली तर ती आनंदमयच होते." लॉर्ड हेन्रीने हसत म्हणाला. " ते जीवनाचे सर्वात मोठे गुपित आहे. पण तरीही मी असे म्हणेन की, खून ही नेहमी एक चुकीची गोष्ट असते. जेवल्यानंतर ज्याबद्दल बोलता येणार नाही, अशी गोष्ट कोणी कधीही करू नये. पण गरीब बिचाऱ्या बेसिलचा विषय जरा बाजूला ठेऊ. मला असा विश्वास ठेवायला आवडेल की त्याला काहीतरी अदभुतरम्य मरण आले. पण ते शक्य नाही .बहुधा तो बसमधून सीन नदीत पडला असावा. अस्वच्छ हिरव्या पाण्यात उताणा पडलेला तो आत्ता मला दिसतो आहे. गेली दहा वर्षे तो चांगली चित्रे काढू शकत नव्हता."

लॉर्ड हेन्री खोलीत येरझाऱ्या घालत होता. संगीत खोलीमध्ये त्याने ठेवलेल्या, विचित्र करड्या रंगाच्या पक्षाच्या डोक्याला, तो हात लावत होता. नंतर त्याने डोरिअनकडे तोंड वळवले. खिशातून रुमाल काढत त्याने चालू ठेवले, "हो. त्याच्या चित्रातून काहीतरी हरवल्यासारखे मला वाटत होते. जेव्हा तू आणि तो परम मित्र राहिला नाहीत, तेव्हा मोठा कलाकार म्हणून तो संपलाच. कशामुळे तुमच्यात वितुष्ट आले? मला वाटते तू त्याला कंटाळलास. असे असेल तर त्याने तुला, कधीच क्षमा केली नसेल आणि हो, त्याने तुझे जे आश्चर्यकारक चित्र काढले होते, त्याचे काय झाले? त्याने ते पूर्ण केल्यावर मी कधीच बघितले नाही."

"ते चोरले गेले, हे मी तुला अनेक वर्षांपूर्वीच सांगितले."

"हो. हो. ते मला आठवले. तुला ते कधी परत मिळालेच नाही का? काय ही लाजिरवाणी गोष्ट! ते खरंच आश्चर्यकारक होते. मला आठवते, मला ते विकत घ्यायचे होते. आत्ता ते माझ्याजवळ हवे होते."

डोरिअन म्हणाला, "खरे पहाता मला ते कधीच आवडले नाही. मी ते काढून घेण्यासाठी, उगीच मॉडेल होऊन उभा राहिलो. त्या गोष्टीची आठवण, ही माझ्यासाठी द्वेषपूर्ण आहे."

"किती उदास दिसतोस तू! इतका गंभीर होऊ नकोस. डोरिअन, माझ्यासाठी थोडे संगीत वाजव आणि वाजवताना हळूच मला सांग, की तू अजून इतका तरुण कसा दिसतोस? मी तुझ्यापेक्षा फक्त दहा वर्षांनी मोठा आहे. तू खरंच, नवल वाटण्यासारखा आहेस."

"हेन्री, कृपया —"

"तू आज दिसतो आहेस, त्यापेक्षा गोंडस तू कधीच दिसला नव्हतास. मी तुला प्रथम पाहिले, त्या दिवसाची तू मला आठवण करून देतो आहेस. तू फार लाजाळू व पूर्णपणे असामान्य होतास. तू बदललास. अर्थात बाह्यरूपाच्या बाबतीत नव्हे. बाहेरून तू अजून तसाच आहेस."

"मी तसाच नाही, हेन्री."

"हो. तू तसाच आहेस डोरिअन, तुझ्याबरोबर अदलाबदली करावी असे मला वाटते. जगाने आपल्या दोघांच्याही विरुद्ध खूप बोंब मारली, शिव्याशाप दिले, पण जगाने नेहमी तुझे कौतुक केले व यापुढेही करत राहील. आयुष्य, ही तुझी एक कलाकृती आहे."

केसांमधून हात फिरवत, डोरिअन पियानोवरुन उठला. "हो. जीवन सुंदर आहे." तो शांतपणे म्हणाला. "पण असेच आयुष्य, मला यापुढे मिळणार नाही आणि तू असल्या गोष्टी, मला सांगू नयेस. तुला माझ्याबद्दलची प्रत्येक गोष्ट माहिती नाही. मला वाटते तसे झाले, तर तू देखील तोंड फिरवशील. तू हसतो आहेस. हसू नकोस."

डोरिअन, तू वाजवायचा का थांबलास? आजच्याइतके छान, तू यापूर्वी कधी वाजवले नव्हतेस. चल आपण क्लबमध्ये जाऊ. या सुंदर संध्याकाळचा शेवटही, आपण तसाच सुंदर केला पाहिजे. लॉर्ड पूल म्हणून एक तरुण आहे. त्याच्याशी मला तुझी ओळख करून द्यायची आहे. तो तुझा अनुकरणप्रिय आहे. त्याला तुझ्याशी ओळख करून घ्यायची आहे. तो खूप मोहक आहे आणि त्याला बघून मला तुझी आठवण होते."


“मी आता चांगला सद्वर्तनी होणार आहे. मी अगोदरच, थोडा बदललो आहे.” डोरिअन हसत बोलला.

“तू बदलू शकणार नाहीस, डोरिअन.” लॉर्ड हेन्री म्हणाला. “तू व मी नेहमी मित्र राहू. उद्या परत ये. आपण दुपारचे जेवण एकत्र घेऊ.”

“हेन्री, मी खरंच यावे असे तुला वाटते?”

“अर्थात. बाग फार चांगली दिसते आहे. मी तुला भेटलो, त्या वर्षापासून, अशी फुले मी पाहिली नव्हती.”

“ठीक आहे. मी अकरा वाजता इथे येईन. बाय. बाय.” डोरिअन म्हणाला.



# प्रकरण १३

## भूतकाळ विसरण्यासाठी

ती छान रात्र होती. सिगरेट ओढत, हातावर कोटाची घडी घेऊन, तो घराकडे चालत निघाला. संध्याकाळच्या वेषातील दोन तरुण त्याच्या अंगावरून गेले. 'हा डोरिअन ग्रे आहे' असे त्यांच्यापैकी एकजण कुजबुजताना त्याने ऐकले. जेव्हा त्याच्याबद्दल बोलले जाई, किंवा त्याला न्याहाळले जाई, तेव्हा तो किती खूष होत असे, ते त्याला आठवले. आपली स्तुती ऐकायचा, आता त्याला कंटाळा आला होता.

तो घरी पोचला तेव्हा, त्याचा नोकर त्याची वाट बघत, थांबलेला दिसला. त्याने त्याला झोपायला पाठवले व स्वतःला वाचनालयातील सोफ्यावर झोकून दिले. लॉर्ड हेन्री म्हणालेल्या काही गोष्टींवर त्याने विचार करायला सुरवात केली.

एखादा माणूस आहे तसाच राहणे, खरंच शक्य होते का? एक काळ असा होता, की जेव्हा तो निरागस व चांगला होता. त्यांनी स्वतःला, भ्रष्ट करून घेतले व दुसऱ्यांवर त्याचा भयानक प्रभाव पडला. त्याला या भ्रष्टाचारामुळे, आनंद मिळाला. तरीही कधीकधी, त्याचा आत्मा अगदी निर्लेप, शुध्द असा होता. ते सर्व निघून गेले का? त्याच्यासाठी आता, काहीच आशा नव्हती का?

वासनेच्या भोवऱ्यातील एका क्षणी, त्याने तरुण रहाण्याची इच्छा केली होती. त्याचे सर्व पतन, त्यामुळे झाले होते. त्याला शासन झाले नव्हते. पण खरे तर, त्याला शिक्षेची जरुरी होती. शिक्षा आत्मा शुद्ध करते.

अनेक वर्षांपूर्वी लॉर्ड हेन्रीने त्याला भेट दिलेला आरसा टेबलावर उभा केलेला होता. त्या चित्रामधील बदल जेव्हा पहिल्यांदा त्याच्या लक्षात आले, त्या भयाण रात्रीची आठवण येऊन, त्याने तो उचलला. एकदा त्याच्यावर प्राणांतिक प्रेम करणाऱ्या कोणीतरी, त्याला वेडे पत्र लिहिले होते. त्याचा शेवट या शब्दांनी झाला होता. 'तू सोन्याचा बनवलेला असल्याने, सर्व जग बदलून गेले आहे.' त्याने त्या शब्दांचा पुनरुच्चार करून बघितला आणि अचानक स्वतःच्या सौदर्याचा, तो द्वेष करू लागला. तो आरसा जमिनीवर फेकून पायाने त्याने त्याचे बारीक तुकडे केले. त्याला बिघडवणारे त्याचे सौदर्यच होते.

भूतकाळाचा विचार करणे, श्रेयस्कर नव्हते. त्याला त्याच्या भविष्याचा विचार करायला हवा होता. ॲलन कँपबेलने एके रात्री स्वतःला गोळी मारून घेतली व त्याचे गुपितही

त्याच्याबरोबर मरून गेले. बेसिल हॉलवर्डच्या नाहीसे होण्यामधील स्वारस्य, निघून जाईल. मग तो पूर्णपणे सुरक्षित होता.

स्वतःचा आत्म्याचा विनाश, त्याला सतावत होता. बेसिलने काढलेल्या चित्रामुळे, त्याचे आयुष्य खलास झाले होते. त्याबद्दल क्षमा करणे, त्याला शक्य नव्हते. सर्व गोष्टीना कारणीभूत, ते चित्र होते. खून हा एका क्षणाचा वेडेपणा असतो. ॲलन कँपबेलच्या बाबतीत, त्यानेच स्वतःला मारून घेतले होते. डोरिअन ग्रेचा त्यात काही संबंध नव्हता.

एक नवे आयुष्य! तेच त्याला हवे होते. त्याचीच तो वाट बघत होता. कदाचित त्याची सुरवात झाली होती. आता तो कधीही, निरागसपणा बिघडवणार नव्हता. तो आता चांगला होणार होता.

कुलुपबंद खोलीतले चित्र आता बदलले असेल का, याचे आश्चर्य त्याला वाटायला सुरवात झाली होती. की ते अजून पूर्वीसारखेच भयानक असेल? कदाचित त्याचे आयुष्य शुध्द, सद्‌गुणी झाले तर, चित्रातील चेहरा पुन्हा सुंदर होईल का? त्याने जाऊन बघावे असे ठरवले.

त्याने टेबलावरून दिवा उचलला व वरती गेला. त्याने दार उघडल्याबरोबर, आनंदाचे हसू त्याच्या चेहऱ्यावर पसरले. हो. तो आता चांगला होईल व मग त्या कुलुपबंद केलेल्या, कुरूप गोष्टीची, त्याला भीती वाटणार नाही. त्याला आधीच, आनंद होऊ लागला.

स्वतःमागे दार लाऊन घेत, तो शांतपणे आत गेला. सरळ चित्राजवळ चालत जाऊन त्याने त्या चित्राला झाकणारा जांभळा पडदा दूर केला. एक रागीट किंकाळी त्याच्या तोंडातून बाहेर पडली. त्याला काहीच बदल दिसला नाही. चित्र अजूनही द्वेष वाटेल, — पूर्वीपेक्षा अधिक द्वेष वाटेल, — असेच होते. हातावरील लाल खुणा अधिक ठळक होऊन, नवीन रक्तासारख्या दिसत होत्या. त्या लाल खुणा, अजून वाढल्यासारख्या दिसत होत्या का? आता त्या सर्व बोटांवर पसरल्या होत्या. रंगवलेल्या चित्राच्या पायावरही, रक्त होते आणि सुरी न धरलेल्या हातावरही रक्त होते.

या सर्वाचा अर्थ काय होता? त्याने पोलिसांकडे जावे का? जे घडले ते सर्व सांगून फाशी जावे का? तो हसला. ही कल्पना वेडेपणाची आहे असे त्याला वाटले. आता त्याने समजा सांगितले तरी, कोण त्यावर विश्वास ठेवणार? खून केलेल्या माणसाचे काहीसुद्धा मागे उरले नव्हते. बेसिल हॉलवर्डच्या मालकीची प्रत्येक गोष्ट त्याने नाहीशी केली होती. बॅग व कोट त्याने स्वतःच जाळले होते. ते त्याला निव्वळ मूर्ख म्हणतील.

हा खून, आयुष्यभर त्याचा पाठपुरावा करत रहाणार होता का? त्याच्या भूतकाळामुळे, तो कायम दुःखी होणार होता का? तरीही त्याला काय करणे शक्य होते? पोलिसांकडे जावे? कधीही नाही.

त्याच्याविरुध्ध ते वापरू शकतील, अशी एकच गोष्ट होती व ती म्हणजे खुद्द ते चित्रच. त्याने ते नाहीसे करावे. इतका काळ तरी त्याने ते, का ठेवले होते? ते चित्र बदलत म्हातारे होत गेले, हे बघण्यात एके काळी त्याला, आनंद वाटला होता. अलीकडे त्याला असा आनंद वाटल्याचे, जाणवले नाही. त्यामुळे उलट त्याची रात्रीची झोप उडाली. जेव्हा तो लांब असे, तेव्हा इतर कुणी व्यक्ती ते बघणार तर नाही ना, अशी त्याला भीती वाटे. फक्त त्या आठवणीने, त्याचे कित्येक आनंदाचे क्षण हिरावून घेतले होते. त्याने ते नष्ट करावे.

त्याने अवतीभवती पाहिले. बेसिल हॉलवर्डची हत्या केलेला चाकू, त्याला दिसला. त्यावर काही डाग राहू नये, म्हणून त्याने तो अनेक वेळा साफ केला होता. तो तेजस्वी व चकचकीत होता. आता तो चित्रकाराची कलाकृती व त्याचे जे काही असेल, ते ठार करणार होता. त्यामुळे भूतकाळ नष्ट झाला असता. एकदा तो नष्ट झाला, की मग तो मोकळा झाला असता. त्याने चाकू उचलून चित्रात घुसवला.

तेथे रडणे, ओरडणे, किंकाळ्या व तोडफोड झाली. किंकाळ्या एवढ्या भयानक होत्या की नोकरमंडळी घाबरून जागी झाली व आपापल्या खोल्यातून बाहेर आली. खालील चौकातून चाललेली दोन माणसे थांबली आणि त्या घराकडे बघू लागली. त्यांनी लगबग करून, एका पोलिसाला बोलावून आणले. पोलिसाने अनेक वेळा घंटी वाजवली पण काही उत्तर मिळाले नाही. वरील एका खिडकीतून येणारा प्रकाश सोडला, तर सर्व घर अंधःकारमय होते. जरा वेळाने तो पोलीस घराच्या पुढील बागेत उभे राहून निरीक्षण करू लागला.

“हे कोणाचे घर आहे?” त्या दोन माणसांपैकी एकाने विचारले.

“मिस्टर डोरिअन ग्रे याचे.” पोलीस उत्तरला.

एकमेकांकडे बघून ते खुनशीपणे हसले व चालू लागले. त्याना डोरिअन ग्रे कोण, हे माहिती होते.

घरामध्ये नोकर मंडळी हलक्या आवाजात कुजबुजत होती. मिसेस लीफ आजीबाई रडत होत्या. फ्रान्सिस तर भीतीने गर्भगळीतच झाला होता.

पाऊण एक तासांनंतर ते, घाबरत घाबरत वर गेले. त्यांनी दारावर टकटक केले, पण एक नाही, की दोन नाही. त्यांनी हाका मारल्या. सर्वत्र सामसूम होते. त्यांनी दार ढकलून पाहिले पण ते बंद होते. शेवटी ते छतावर चढले व खिडकीतून खोलीत प्रवेश केला.

ते आत आले, तेव्हा त्याना भिंतीवर लटकत असलेले एक फाटके तुटके चित्र दिसले. शेवटी त्यांनी डोरिअन ग्रेला पाहिले तसेच ते चित्र होते. तरुण व सुंदर! संध्याकाळचे कपडे घातलेला एक मनुष्य जमिनीवर मरून पडला होता. त्याच्या काळजात चाकू भोसकलेला होता. तो म्हातारा व भयाण कुरूप होता. त्याच्या बोटातील अंगठ्या बघेपर्यंत, तो डोरिअन ग्रे असल्याचे, त्याना समजलेच नव्हते.

---- समाप्त----

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची बारा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, डॉ वृषाली जोशी यांची तीन अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष
ई साहित्य प्रतिष्ठान